।। ज्ञानेश्वरी ।।

अध्याय पहिला

ॐ नमो जी आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।। १ ।।

जी ॐ नमो! जी म्हणजे समोर असलेले श्रीगुरू निवृत्तिनाथ महाराज. त्यांना माउली ओंकारस्वरूपात्मक पाहत नमस्कार करतात. वेदप्रतिपादित आत्मरूप असणारा जो स्वसंवेद्य, आद्य त्याचा जयजयकार असो. भागवतातील वेदस्तुती ही जयजयकार करणारी आहे. गोपीगीत 'जयतितेऽधिकं'पासून प्रारंभ होतं. माउली जय जय शब्दाला मंत्र मानतात; ज्याचा प्रयोग अनुभवी संत करतात, 'जयजयमंत्रे अर्पिती । माझ्या ठायी ।।' (९-२२६) स्वसंवेद्य हा शब्द गंभीर असून चिंतनीय आहे. जीव हा सर्व काही करू शकतो; परंतु स्वत: स्वत:ला जाणू शकत नाही. व्यापक परमात्मा हा स्व सम्यक वेद्य आहे. आद्य शब्दाचा अर्थ सर्वांचा आद्य आहेच; परंतु आद्य शब्दाला आदिवृद्धीत गृहीत धरलं, तर 'वर्तमान' असा अर्थ होतो. केवळ पूर्वी होता असं नाही, तर तो वर्तमान आहे. आत्मरूपता ही अनुभवी संतांची अनुभूती आहे.

देवा तूंचि गणेश । सकलार्थमतिप्रकाश ।
म्हणे निवृत्तिदास । अवधारिजो जी ।। २ ।।

निवृत्तिनाथांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, जी, देवा तूचि गणेश. मतीतील सकल अर्थांना प्रकाशित करणारा प्रकाश आपण आहात. आपल्या कृपाप्रसादानं प्रकाशित झालेले अर्थ आपणच : 'अवधारिजो'.

हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेष ।
तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ।। ३ ।।

वेदाला शब्दब्रह्म म्हणतात. संपूर्ण शब्दब्रह्म हीच चांगला वेष परिधान केलेली गणपतीची मूर्ती आहे. वपु म्हणजे शरीर. वर्णवपु म्हणजे निर्दोष अक्षरांचं शरीर शोभा देत आहे. शोभा असणाऱ्यांनी मिरवावं.

स्मृती तेचि अवयव । देखा आंगिक भाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ।। ४ ।।

अवयवांना स्वत:चा डौल असतो. त्यातील 'आंगिक भाव', लावण्य पाहता यावं यासाठी दृष्टी हवी. ज्यांना दृष्टी आहे त्यांना माउली म्हणतात 'देखा'. अध्ययन, साधना आणि अनुभूती

यांच्या मिश्रणातून स्मृतिग्रंथ जन्माला आले आहेत. तेच गणपतीचे डौलदार अवयव आहेत. त्यांचा आंगिक भाव आणि लावण्याची ठेव म्हणजे सौंदर्याची खाण पाहा.

अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें ।
पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांचीं ।। ५ ।।

अठरा पुराणं ही उत्तम रत्नं आहेत. पद म्हणजे–श्लोक, पद्धती म्हणजे विविधा–हीच जणू कोंदणं आहेत. त्या कोंदणात प्रमेय म्हणजे सिद्धांत, अर्थात गद्यपद्यांची कोंदणं, ही सिद्धांतरत्नांनी जडवलेली आहेत.

पदबंध नागर । तेंचि रंगाथिलें अंबर ।
जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ।। ६ ।।

नागर म्हणजे विदग्धरसवृत्तीची पदरचना. हीच पदरचना म्हणजे सुंदर रंगविलेलं वस्त्र. त्या वस्त्रातील नक्षीकाम म्हणजे साहित्यातील अलंकारशास्त्र. विविध अलंकार ठळक दिसतात, प्रकाशमान होतात.

देखा काव्यनाटका । जें निर्धारितां सकौतुका ।
त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ।। ७ ।।

पाहा, वाल्मिकादिकांचं काव्य, कालिदासादिकांचं नाटक यांची सकौतुक समीक्षा केली असता, त्यात अर्थध्वनी जाणवतो. ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे, असं विद्वान मानतात. काव्यनाटक या गणपतीच्या पायातील लहान घागऱ्या आहेत.

नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी ।
दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ।। ८ ।।

काव्य आणि नाटक निपुणपणे पाहता कवीचं कौशल्य आणि सिद्धांताची उत्तम रत्नं पदरचनेत दिसतात. निपुणपण हे अधिक महत्त्वाचं आहे. शास्त्र अध्ययन, साहित्याची जाण, पदरचनेतील बारकावा, शब्दांचा भाव आणि सिद्धांताची सूक्ष्मता, रसिकता यांचं मिश्रण म्हणजे निपुणपण होय.

जेथ व्यासादिकांची मती । तेचि मेखळा मिरवती ।
चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ।। ९ ।।

पदबंधानं रंगवलेलं वस्त्र कमरेला ज्यानं बांधतात ती मेखला. ही मेखला व्यासादिकांची प्रतिभा होय. पल्लवसडका, म्हणजे मेखलेचा पदर; तो प्रतिभेतील चोखाळपणा दर्शवितो.

देखा षड्दर्शनें म्हणिपती । तेचि भुजांची आकृती ।
म्हणऊनि विसंवाद धरिती । आयुधें हातीं ।। १० ।।

महर्षी व्यासांचं वेदांतशास्त्र, गौतम मुनींचं न्यायशास्त्र, कणादांचं वैशेषिक, बौद्ध दर्शन, जैमिनीचं पूर्वमीमांसा, कपिल महामुनींचं सांख्यशास्त्र ही सहा दर्शनं आहेत. गणपतीच्या भुजांची ही आकृती आहे. भुजा या पुरुषार्थाचं प्रतीक आहेत. दर्शनशास्त्र हे भारताचं बौद्धिक वैभव आहे; ज्याचं अनुकरण मानवजात करत आहे. भारतातील वैचारिक स्वातंत्र्यामुळे द्वादशदर्शनं जन्माला आली. माउलींचा गणपती सहा भुजांचा आहे. सहा दर्शनशास्त्रांची तत्त्वं, म्हणजे सहा आयुधं होत. ही वेगवेगळी असली, तरी ती सिद्धांताभासाची नियंत्रक आहेत.

तरी तर्क तोचि फरशु । नीतिभेद अंकुशु ।
वेदान्त तो महारसु । मोदक मिरवे ।। ११ ।।

न्याय आणि वैशेषिक हे तर्क आणि अंकुश आहेत. अंकुश नियंत्रण ठेवतो. चुकीच्या सिद्धांतांचं नियंत्रण करण्यासाठी न्यायशास्त्राचा उपयोग होतो. वाद, तर्क हेतू इत्यादी प्रमुख अंकुश आहेत. 'विशेष' पदार्थ मानल्यामुळे वैशेषिक शास्त्र, असं नामाभिधान झालं. यालाच सिद्धांत भेद, नीतिभेद म्हणतात. पृथ्वी परमाणुहून जलादि परमाणु भिन्न कसे, यावर महर्षी कणाद 'विशेष पदार्थ नियंत्रण करतो,' असं म्हणतात. न्यायशास्त्रातील तर्क हा परशु आहे, तर विशेष पदार्थ सिद्धांतभेद अंकुश आहे. जीवनात मोद आणणारा मोदक; ज्यात चैतन्याचा गोडवा आहे, ते वेदान्त शास्त्र गणपतीच्या हातातील मोदक आहे.

एके हातीं दंत । जो स्वभावता खंडित ।
तो बौद्धमतसंकेत । वार्तिकाचा ।। १२ ।।

एका हातात आयुध म्हणून असलेला स्वभावत: खंडित दन्त बौद्धमताचा संकेत आहे.

मग सहजें सत्कारवाद । तो पद्मकर वरद ।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्ध । अभयहस्त ।। १३ ।।

'सर्वं शून्यं शून्यम्' याचं खंडन झाल्यानंतर मग सत्कारवाद; जो पद्मकर आहे. कमळ धारण केलेला असून वर देणारा आहे. सांख्यशास्त्र हा हात आहे. योग आणि सांख्य हे एकच आहेत, असं गीतेत आलं आहे.

देखा विवेक तंव सुविमळ । तोचि शुंडादंड सरळ ।
जेथ परमानंद केवळ । महासुखाचा ।। १४ ।।

माउलींच्या गणपतीची सोंड सरळ आहे. सारासार विचार हाच शुद्ध विचार आहे. 'सु' म्हणजे चांगला. 'वि' म्हणजे विगत:, अर्थात 'गेलेला आहे मळ ज्याचा (मल म्हणजे पापवासना)'; असा विवेक हा सरळ शुंडादंड आहे. सोंड ग्रहण आणि त्याग याचं माध्यम आहे. हे माध्यम विवेकपूर्ण आणि सरळ असेल, तर तिथं महासुखाचा परमानंद असतो. केवळ म्हणजे व्यापक,

परब्रह्म, विषयाशिवाय असणारा परम आनंद. शुद्ध विवेकात महासुखाचा परमानंद असतो. विचार सरळ असावेत.

तरी संवाद तोचि दशन । जो समता शुभ्रवर्ण ।
देव उन्मेषसूक्ष्मेक्षण । विघ्नराज ।। १५ ।।

'तरी' हा दोन वाक्यांना जोडणारा अव्यय आहे. स्पष्ट संवादासाठी दात आवश्यक असतात. दातांची शुभ्रता हीच समतेची शुभ्रता आहे. उन्मेष म्हणजे ज्ञान. ईक्षण म्हणजे पाहणं. ज्ञानदृष्टीनं सूक्ष्म ईक्षण करणारा हा देव विघ्नांचा नाश करणारा राजा आहे.

मज अवगमलिया दोनी । मीमांसा श्रवणस्थानीं ।
बोधमदामृत मुनी । अली सेविती ।। १६ ।।

माउली म्हणतात, मला असं जाणवतं, की दोन्ही श्रवणस्थानी मीमांसा करणाऱ्या श्रुती आहेत. आज्ञा करणाऱ्या कर्म विधेयात्मक श्रुती आणि ज्ञानमीमांसक श्रुती असं अंतर आहे. गुंजन करत पराग सेवणारे 'अलि' म्हणजे भ्रमर, अर्थात् मनन करणारे मुनी हे बोधमदामृत सेवन करतात.

चिंतन – पूर्व-उत्तर मीमांसा या भुजा आहेत. त्या पुन्हा श्रवणस्थान ग्रहण करत नाहीत, म्हणून मीमांसात्मक श्रुती श्रवणस्थानी आहेत.

प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ ।
सरिसे एकवटती इभ । मस्तकावरी ।। १७ ।।

द्वैत-अद्वैत हीच गणपतीची मस्तकावरील गंडस्थळं आहेत; जी सिद्धांतरूपी रसानं भरलेली आहेत. हाच प्रमेयरूपी रस श्रुतीतून मदरूपानं वाहतो; त्याचं सेवन मुनी करतात. हेच मुनी पुढं षड्दर्शन निर्माण करतात.

उपरि दशोपनिषदें । जिये उदारज्ञानमकरंदें ।
तिये कुसुमे मुकुटीं सुगंधें । शोभती भलीं ।। १८ ।।

दशोपनिषदं ही श्रुतीची फुलं आहेत; जी ज्ञानमकरंदानं भरलेली आहेत. गणपतीच्या मुकुटावर शोभणारी ही फुलं ज्ञानसुगंध देण्यासाठी उदार आहेत.

अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल ।
मकार महामंडल । मस्तकाकारें ।। १९ ।।

ॐ कारातील अकार हे दोन चरण आहेत. उकार विशाल उदर आहे. मकार मस्तकरूपी महामंडळ आहे.

हे तीन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें ।
ते मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज ।। २० ।।

ओंकार हे जगाचं आदिबीज आहे. अकार, उकार, मकार एकत्रित झालेला जो ओंकार आहे, त्याने शब्दब्रह्मास कवळिलं. अशेष शब्दब्रह्म जे आदिबीजात सामावलं आहे, त्याला मी श्रीगुरुकृपेमुळे वंदन करतो.

चिंतन – गणपती रूपकात चढता क्रम आहे. स्मृतिप्रमाणे वागणं, पुराणकथा आवडणं, साहित्यप्रेमी असणं, काव्य आणि नाटक यांत रसिक असून समीक्षक असणं, दार्शनिक होणं, सारासार विवेकी असणं, ज्ञानाची सूक्ष्म दृष्टी प्राप्त होणं, श्रुतीचं अध्ययन आणि मंत्र मीमांसक होणं इतकी योग्यता आल्यावर द्वैत-अद्वैत याची उंची कळणं, दशोपनिषदातील ज्ञान मकरंद आणि सुगंध याची अनुभूती घेणं, यानंतर श्रीगुरुकृपेनं ओंकाराचा साक्षात्कार होतो. या अठरा ओव्या माउलींची योग्यता दाखवतात, ज्यांची ज्ञानेश्वरी आहे, त्यांची ही उंची आहे. त्यांच्या अक्षराची समीक्षा करताना आपली कुवत पाहावी; अन्यथा 'उगियाचि माथा ठेविजे चरणी। हेचि भले।।'

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ।। २१ ।।

व्यवहारिक चातुर्य, अर्थ, कला यांची स्वामिनी श्रीशारदा आहे. तीच वाग्विलास करणारी आहे. विश्वमोहिनी श्रीसरस्वतीस मी नमन केलं. ग्रंथात नूतनता असावी म्हणून शारदेला 'अभिनव' हे विशेषण आहे. ज्ञानेश्वरीत काव्य आणि दर्शन याचा संयोग पृथ्वीवर पहिल्यांदाच होत आहे. हीच अभिनवता यावी, म्हणून 'अभिनव वाग्विलासिनी'ला नमिली.

मज हृदयीं सद्गुरू । जेणे तारिलों हा संसारपूरू ।
म्हणऊनि विशेषे अत्यादरू । विवेकावरी ।। २२ ।।

माझ्या हृदयात सद्गुरू आहेत; ज्यांनी या संसारापुरातून मला तारलं. अनुभवामुळे विशेष विवेकावर अति आदर आहे. सारासार विचारालाच इथं विशेष विवेक समजावा. जगण्यासाठी विचार हा सामान्य आहे.

जैसे डोळ्यां अंजन भेटे । ते वेळी दृष्टीसी फांटा फुटे ।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी ।। २३ ।।

प्रथम डोळे असावेत. दृष्टी वाढवणारं अंजन मिळालं, तर असणारी दृष्टी सामर्थ्यवान होते. जिथं ठेवा आहे, तो प्रकट करण्यासाठी मार्ग दिसतो.

कां चिंतामणी आलिया हाती । सदा विजयवृत्ती मनोरथीं ।
तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेव म्हणे ।। २४ ।।

चिंता मिटविणारा चिंतामणी हाती आल्यामुळे मनोरथात सदैव विजयवृत्ती असते. सद्‌गुरू श्रीनिवृत्ती असल्यामुळे मी पूर्णकाम आहे, असं माउली म्हणतात.

चिंतन – विजयवृत्ती असणं म्हणजे निर्भय असणं, मनोरथामागे असणं नव्हे! 'मी पूर्णकाम' हे पद विशेष चिंतनीय आहे. पूर्णत्वाच्या अवस्थेतून ज्ञानेश्वरीचं प्रकटीकरण होत आहे. पूर्णता हे सर्वज्ञतेचं उपलक्षण आहे.

म्हणोनि जाणतेणे गुरु भजिजे । तेणे कृतकार्य होइजे ।
जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ।। २५ ।।

म्हणून जाणत्यांनी श्रीगुरूंची भक्ती करावी; जेणेकरून 'पूर्णकाम' होता येईल. ज्याप्रमाणे झाडाच्या मुळाला पाणी दिल्यानं शाखा आणि पालवी टवटवीत होत पुष्ट होते; त्याप्रमाणे श्रीगुरुभक्ती ही जीवनातील सर्वांगांना पूर्ण करते. अर्थात ज्ञानदृष्टी, विजयवृत्ती, पूर्णकामता हृदयात श्रीगुरू साठवल्यामुळे प्राप्त होते.

का तीर्थें जिये त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं ।
ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ।। २६ ।।

एकात सर्व या न्यायानं समुद्र स्नानात सर्व तीर्थस्नान, अमृतरसात सर्व रस त्याप्रमाणे.

तैसा पुढतपुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि ।
अभिलषित मनोरुचि । पुरविता तो ।। २७ ।।

पुन्हा पुन्हा मी श्रीगुरूंना अभिवंदन केलं, श्रीगुरू हे इच्छित मनोरथ पूर्ण करणारे आहेत.

आतां अवधारा कथां गहन । जे सकळ कथा जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।। २८ ।।

मंगलाचरणानंतर गहन असलेल्या कथांचं जे जन्मस्थान आहे, ते महाभारत माहात्म्य ऐका. विवेकतरूंचं ते जणू काही अभिनव उद्यानच आहे.

ना तरी सर्व सुखाची आदि । जे प्रमेयमहानिधि ।
नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे ।। २९ ।।

अथवा, आदि म्हणजे मूळ परब्रह्म आहे, त्या सुखाच्या सर्व प्रमेयांचा महानिधी महाभारतात आहे. केवळ सिद्धांताचा रुक्षपणा आहे असं नव्हे, तर नऊ रसानं परिपूर्ण भरलेला हा समुद्र आहे.

कीं परमधाम प्रगट । सर्व विद्यांचे मूळपीठ ।
शास्त्रजातां वसौट । अशेषाचे ।। ३० ।।

असं वाटतं, जगाचं परमधाम महाभारतात प्रकट झालं आहे. सर्व विद्यांचं मूळपीठ असून सर्व

शास्त्रांचं आश्रयस्थान आहे.

ना तरी सकळ धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार ।
लावण्यरत्नभांडार । शारदेचें ।। ३१ ।।

किंबहुना सकळ धर्म म्हणजे मानव धर्म, शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सत्त्वादिगुणयुक्त यांच्या ज्ञानाचं माहेर म्हणजे महाभारत. सज्जनांचं हृदय, सरस्वतीचे सौंदर्यरत्न ठेवण्याचं भांडारगृह.

नाना कथारूपे भारती । प्रगटली असे त्रिजगती ।
आविष्कारोनि महामती । व्यासाचिये ।। ३२ ।।

अथवा, सरस्वतीच स्वत: व्यासांच्या महामतीत स्फुरित होऊन कथारूपानं या त्रिजगतात प्रकट झाली.

म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथगुरुवतीचा ठावो ।
एथूनि रसा झाला आवो । रसाळपणाचा ।। ३३ ।।

म्हणूनच महाभारत हा काव्यग्रंथाचा राजा आहे. इतर जे कथाग्रंथ आहेत, त्यांच्या थोरपणाचा हा आधार आहे. याच महाभारतातून नऊ रसांना रसाळपणाचा डौल आलेला आहे.

तेवींचि आइका आणीक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक ।
आणि महाबोधीं कोंवळीक । दुणावली ।। ३४ ।।

आणखी एक ऐका! महाभारतापासून शब्दांच्या वैभवाला सत् शास्त्रीयपणा लाभला. अवघड असणाऱ्या महाबोधाची कोवळीक दुप्पट झाली.

एथ चातुर्य शाहणे झाले । प्रेम रुचीस आले ।
आणि सौभाग्य पोखले । सुखाचे एथ ।। ३५ ।।

रावण, दुर्योधनासारखं वेडं चातुर्य नसावं. चातुर्याला शहाणपण देणारं महाभारत आहे. देव आणि भक्ताच्या कथा प्रेमात रुची निर्माण करणाऱ्या आहेत. अन्य प्रेमाचंही वर्णन आहेच. इथं सुखाचं सौभाग्य पुष्ट होतं. संसारिकात धनामुळे सुविधा आहेत; परंतु सुख असेलच असं सांगता येत नाही.

चिंतन – ज्ञान, प्रेम आणि सुख हे महाभारतामुळे बलवान होतात. काही ज्ञानेश्वरीत ''प्रमेय रुचीस आले'' असा पाठभेद आहे. भाषेमुळे सिद्धांतात गोडवा आला.

माधुर्यी मधुरता । श्रृंगारीं सुरेखता ।
रूढपण उचितां । दिसलें भलें ।। ३६ ।।

पाकशास्त्रातील विविधता, त्यात पुन्हा मधुरता. श्रृंगार शब्दात वस्त्रअलंकारादिंचा समावेश

आहे. त्याचबरोबर ''श्रृंगार''ही सुरेख असावा हे महाभारतामुळे चांगलं समजतं. रूढपणा म्हणजे ''आचार गौरव'' वागण्यातील, आचरणातील, वंशाच्या चालीरीती यांचं दर्शन योग्य पद्धतीनं महाभारतात दिसतं.

एथ कळाविदपण कळा । पुण्यासि प्रताप आगळा ।
म्हणऊनि जनमेजयाचे अवलीळा । दोष हरले ।। ३७ ।।

महाभारतात कलेत कौशल्य कसं असावं, याचं प्रशिक्षण आहे. पुण्य प्रभावी व्हायची साधना आहे. याच महिमेमुळे परीक्षित पुत्र जन्मेजयाचे दोष महाभारत श्रवणाने नाहीसे झाले.

आणि पाहता नावेक । रंगी सुरंगतेची आगळिक ।
गुणा सगुणपणाचे बिक । बहुवस एथ ।। ३८ ।।

नावेक म्हणजे क्षणभर. महाभारताकडे जर क्षणभर समीक्षावृत्तीनं पाहिलं, तर रंगात म्हणजे रंजनात, नृत्यगायनादित विशेषपणा आणला. गुणामध्ये अर्थात् सद्गुणामध्ये, साधकाच्या, राजाच्या, संतांच्या, ऋषिमुनी इत्यादिकांच्या गुणात सगुणपण आणलं. सद्गुणाचं पुष्कळ पद्धतीने सामर्थ्य वाढवलं. बिक म्हणजे सामर्थ्य.

भानुतेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें ।
तैसें व्यासमतीं कवळिलें । मिरवे विश्व ।। ३९ ।।

अंधारात असलेल्या जगाला सूर्यतेज जसं उजाळतं, स्पष्टपणा येतो; त्याचप्रमाणे अज्ञातविश्व व्यासमतीनं सुप्रकाशित केलं. वैश्विक सिद्धांत स्पष्ट दिसू लागले.

कां सुक्षेत्री बीज घातले । ते आपुलियापरी विस्तारले ।
तैसे भारती सुरवाडले । अर्थजात ।। ४० ।।

चांगल्या जमिनीत बीज पेरले असता, त्याचा हवा तसा विस्तार होतो; त्याचप्रमाणे ''अर्थजात'' म्हणजे जगातील सर्व अर्थ महाभारतात बहरले.

ना तरी नगरांतरीं वसिजे । तरी नागरचि होइजे ।
तैसें व्यासोक्तितेजे । धवळत सकळ ।। ४१ ।।

ग्रामीण मनुष्य शहरात चांगल्याच्या संगतीत असला, तर तो 'नागर' होतो. सभ्यतायुक्त शहाणा होतो. त्याप्रमाणे सामान्य अर्थदेखील महाभारतात व्यासोक्तीनं प्रकाशित झाले.

कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी ।
प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ।। ४२ ।।

तारुण्याच्या प्रथम अवस्थेत स्त्रियांमध्ये सौंदर्याची शोभा विशेषरूपानं दिसते.

ना तरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे ।
आदिलापासोनि अपाडें । जियापरी ।। ४३ ।।

नाना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण ।
मग अळंकारीं बरवेपण । निवाड दावी ।। ४४ ।।

तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे ते बरवेपण पातलें ।
तें जाणोनि आश्रयिलें । इतिहासीं ।। ४५ ।।

ज्याप्रमाणे उद्यानात सौंदर्य अगोदरपासूनच असतं; परंतु सौंदर्याची खाण वसंतऋतू आल्यानंतरच दिसते. आदिपेक्षा अधिक, अपूर्व सौंदर्य जाणवतं किंवा सोन्याची लगड पाहिली असता सामान्य वाटते; परंतु त्याच सोन्याचे अलंकार विशेष आकर्षक वाटतात. त्याचप्रमाणं सामान्य विषय व्यासोक्तीनं सजवून विशेष केलं; किंबहुना विशेष विषयांना सजवलं म्हणून हवंहवंसं वाटणाऱ्या सौंदर्याला प्राप्त झालं. हे जाणून सर्व विषयांनी, कथांनी महाभारतात आश्रय घेतला.

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं । सानीव धरूनि अंगीं ।
पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ।। ४६ ।।

किंवा जगात पूर्ण प्रतिष्ठा मिळावी म्हणून सर्व पुराणे लहानपणा धारण करून आख्यानरूपानं महाभारतात आली.

म्हणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहे लोकीं तिहीं ।
येणेकारणे म्हणिपे पाहीं । व्यासोच्छिष्ट जगत्त्रय ।। ४७ ।।

महाभारतात जे नाही ते त्रैलोक्यात नाही म्हणूनच 'व्यासोच्छिष्ट जगत्त्रय' असं म्हणतात. अर्थात संपूर्ण जगत हे व्यासांचे उष्टं आहे.

ऐसीं जगीं सुरस कथा । ते जन्मभूमि परमार्था ।
मुनि सांगे नृपनाथा । जनमेजया ।। ४८ ।।

अशी सुरसयुक्त असणारी कथा जी परमार्थाची जननी आहे. हे वैशंपायन मुनी राजा जन्मेजयांना सांगत आहेत.

जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम ।
परम मंगळधाम । अवधारिजो ।। ४९ ।।

महाभारत हे अद्वितीय असून उत्तम आहे. जगात एकमेव पवित्र 'ज्ञान' आहे, ते यात आहे. हा ग्रंथ कल्याणाचं स्थान असल्यामुळे निरूपम आहे.

चिंतन – अठ्ठावीस ओव्यांपासून महाभारतमाहात्म्य, व्यासमती आणि उक्ती याचं वर्णन केलं

आहे. सांगणारा कोण आहे? त्याची प्रतिभा आणि उक्ती किती महत्त्वाच्या आहेत, हे प्रथम समजलं पाहिजे. शब्दातील गांभीर्य, अर्थसखोलता, अलंकार, रस अनुभूती यांचं मिश्रण यात आहे. जेव्हा आपण वाचन करतो, तेव्हा अत्यंत सावधपणा हवा. रसास्वाद आणि अनुभूती यावी, असं वाटत असेल, तर अक्षरातील सूक्ष्मपणा टिपण्याची कला हवीच.

आतां भारतकमळपराग । गीताख्य प्रसंग ।
जो संवादला श्रीरंग । अर्जुनेंसीं ।। ५० ।।

यानंतर आता 'गीता' या नावानं प्रसिद्ध जो श्रीकृष्णार्जुनाचा संवाद आहे; तो महाभारतरूपी कमळाचा पराग आहे. 'श्रीरंग' नामाभिधान समजणं गरजेचं आहे. 'प्रशसस्य श्र:' प्रशस्य म्हणजे कल्याण. प्रशस्य या शब्दाला 'श्र' आदेश होतो. श्री म्हणजे कल्याणकारक. श्रीरंग म्हणजे कल्याण करण्यात रंगलेला असा. तो अर्जुनासी संवादला.

ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथियला व्यासबुद्धि ।
निवडिलें निरवधि । नवनीत हें ।। ५१ ।।

मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें ।
पद आलें परिपाकें । आमोदासी ।। ५२ ।।

अथवा श्रुतीरूपी समुद्राचं व्यासांच्या बुद्धीनं मंथन करून महाभारतरूपी लोणी काढलं. त्या लोण्याला ज्ञानाग्नी संपर्कात आणून विवेकानं कढ दिला. कढ किती प्रमाणात असावा, याला फार महत्त्व आहे. परिपक्व झालेल्या तुपाचा वास जसा दरवळतो; तसाच गीतेचा परिपक्व सुगंध दरवळू लागला.

जें अपेक्षिजे विरक्तीं । सदां अनुभविजें संतीं ।
सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ।। ५३ ।।

जे आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं ।
ते भीष्मपर्वी संगती । सांगिजेल ।। ५४ ।।

अपेक्षा सोडून जे विरक्त झाले आहेत, ते या गीतेची अपेक्षा करतात. संत ज्या तत्त्वाची अनुभूती घेतात, तो मी आहे. याचा अनुभव घेणारे जे योगी आहेत ते जिथे रमतात, भक्तांकडून जी ऐकली जाते, त्रैलोक्यात जी प्रथम वंदनीय आहे, ती भीष्मपर्वात आली आहे.

जें भगवद्गीता म्हणिजे । जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे ।
जें सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ।। ५५ ।।

जिला 'भगवद्गीता' असं म्हणतात. ब्रह्मदेव आणि श्रीशंकर जिची प्रशंसा करतात. सृष्टीतील

आद्य संत जे सनकादिक आहेत, जिचं आदरानं सेवन करतात, अशी महान श्रीमद् भगवद्गीता आहे.

जैसे शारदीचिये चंद्रकळे । माजि अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ।। ५६ ।।

तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ।। ५७ ।।

ज्याप्रमाणे शरद ऋतूतील चंद्रकलेतील अमृताचे कोवळे कण चकोराची पिले कोवळ्या मनानं टिपतात, त्याप्रमाणे श्रोत्यांनी चित्तात हळुवारपणा आणून ही कथा; किंबहुना श्रीकृष्णार्जुन संवाद अनुभवावा.

चिंतन – श्रोत्यांचं हृदय लहान मुलाप्रमाणे निरागस असावं, रसास्वाद घेण्यासाठी संवेदनशीलता पाहिजे, सिद्धांताचं अध्ययन करीत असता, बुद्धी काठिण्याचा अनुभव घेते. काही रसिकांचं मन हळवं असतं. मित्रप्रेमातून गीतेचा जन्म आहे. हे प्रेम सामान्य माणसांचं नाही. एक द्वारकाधीश असून प्रेमाची देवता आहे. दुसरा युवराज असून भक्त आहे. श्रोत्यांनी पूर्वग्रह सोडून चित्तात हळुवारपणा आणून, अक्षरातील अक्षराची अनुभूती घ्यावी. मवाळ मन आणि हळुवार चित्त हे अनुभूतीसाठी आवश्यक आहे. हे असल्यास त्याचा विनियोग कसा करायचा ते पुढील तीन ओव्यांत सांगतात. आस्वाद घेण्याची कला माहीत नसेल, तर ज्ञानदेखील ओझं होतं. रस नीरस होतात. अक्षरातील ध्वनी ऐकू येत नाही.

हे शब्दें‌वीण संवादिजे । इंद्रिया नेणतां भोगिजे ।
बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासीं ।। ५८ ।।

अनुभूती घेत असता भावविभोर व्हावं, हा शब्दावीण संवाद आहे. आठवणी हृदयात असतात. त्यांचा उपभोग इंद्रियांशिवाय असतो. हे 'इन्द्रिया नेणता भोगिजे.' सिद्धांताच्या अनुभूतीसाठी, बोलण्याआधी सिद्धांताला झटावं. अर्थात, शब्दांच्या अलंकारादिकांकडे न पाहता सिद्धांतात प्रवेश करावा.

जैसे भ्रमर पराग नेती । परी कमळदळें नेणती ।
तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ।। ५९ ।।

ज्याप्रमाणे भ्रमर कमलदळांना न समजू देता परागाचं सेवन करतो; त्याप्रमाणे अक्षरातील अनुभूतीचा आस्वाद घ्यावा. ही या ग्रंथाची अर्थसेवन पद्धती आहे.

कां आपुला ठाय न सांडितां । अलिंगिजे चंद्र प्रगटतां
हा अनुराग भोगितां । कुमुदिनी जाणे ।। ६० ।।

अथवा, चंद्र दिसू लागताच कुमुदिनी स्वत: प्रफुल्ल होते. प्रेमसौख्य भोगण्यासाठी आपलं स्थान न सोडता चंद्राला आलिंगन देते. हे प्रीतीसुख केवळ कुमुदिनीच जाणते.

ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंत:करणें ।
आथिला तोचि जाणे । मानू इये ।। ६१ ।।

अशा गंभीरतेनं आणि स्थिर अंत:करणानं जो संपन्न आहे, तोच या ग्रंथातील अनुभूतीसाठी योग्य आहे; किंबहुना त्यालाच इथे मान आहे.

अहो अर्जुनाचिये पांती । जे परिसणया योग्य होती ।
तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें ।। ६२ ।।

श्रोतेहो, अर्जुन समर्पित आणि एकाग्र श्रोता आहे. याच्या पंक्तीला बसून ऐकण्याची ज्याची पात्रता आहे, कृपया त्या संतांनीच अवधान द्यावे. अवधारिजो, अवधान म्हणजे केवळ ऐकणं नव्हे. ध्यानपूर्वक अर्थग्रहण, असा अर्थ घ्यावा.

चिंतन – इथे संत या शब्दाचा 'अधिकारी' असा अर्थ घ्यावा. समोर श्रीगुरू असल्यामुळे 'संत' हे विशेषण दिले आहे.

हें सलगी म्यां म्हणितलें । चरणालागोनि विनविलें ।
प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणऊनियां ।। ६३ ।।

सलगी म्हणजे लडिवाळपण. श्रीगुरूंना 'लक्ष द्या' असं प्रेमानं म्हणत आहेत. आपलं हृदय सखोल आहे. आपल्या चरणाला स्पर्श करून आपल्याला विनंती केली आहे.

जैसा स्वभाव मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।
तरी अधिक तयाचा । संतोष आथी ।। ६४ ।।

ज्याप्रमाणे बोबडं बोलणाऱ्या मुलाचं कौतुक करणं हा आई-वडिलांचा स्वभावच असतो. बोलता येतं याचाच संतोष जास्त असतो.

तैसा तुम्हीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला ।
तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थूं काई ।। ६५ ।।

आई-वडिलांप्रमाणे तुम्ही (श्रीगुरूंनी) माझा अंगिकार केला आहे. सज्जनांनी 'आपला आहे' असं म्हटलं, मग माझ्या उणिवेला क्षमा करालच. यासाठी मी का प्रार्थना करू?

परी अपराध तो आणीक आहें । जें मी गीतार्थ कवळूं पाहें ।
तें अवधारा विनवूं लाहें । म्हणऊनियां ।। ६६ ।।

परंतु आणखी एक अपराध करितो आहे. गीता नव्हे, गीतार्थाचं आकलन करू पाहतोय. 'अवधान द्यावं', म्हणण्याचं हे कारण आहे.

हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता ।
येरवीं काय भानुतेजीं खद्योता । शोभा आथी ।। ६७ ।।

गीतार्थ हा अनाकलीय असून, बुद्धीच्या आटोक्यात न येणारा आहे. तरीदेखील गीतार्थ मराठीत आणण्याचं धैर्य मनात जन्माला आलं आहे. सूर्यप्रकाशात काजव्याची शोभा असते काय?

कीं टिटिभू चांचुवरी । माप सूये सागरीं ।
मी नेणत त्यापरी । प्रवर्तें एथ ।। ६८ ।।

अथवा, टिटवी आपल्या चोचीनं समुद्राची खोली मोजत आहे; त्याप्रमाणे मी अज्ञानवश गीतार्थ अनुवादाकडे प्रवृत्त झालो आहे.

आयका आकाश गिवसावें । तरी आणीक त्याहूनि थोर होआवें ।
म्हणऊनि अपाड हें आघवें । निर्धारितां ।। ६९ ।।

ऐका, आकाश कवळीत घ्यायचं असेल, तर त्याहून मोठं असावं लागतं. तसा विचार केला तर अशक्य आहे; तरीदेखील मी इथं प्रवृत्त होत आहे.

तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभु विवरी ।
जेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनि ।। ७० ।।

स्वत: भगवान शंकर या गीतार्थाची थोरवी सांगत असता, 'एवढी थोरवी कशी' म्हणून भवानीनं आश्चर्यानं प्रश्न विचारला.

तेथ हर म्हणे नेणिजे । देवि जैसें कां स्वरूप तुझें ।
तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ।। ७१ ।।

त्या प्रश्नाच्या उत्तरात श्रीमहादेव म्हणतात, तुझं स्वरूप जसं नित्यनूतन आहे; परंतु का आहे हे कळत नाही. त्याप्रमाणे गीतार्थाचं स्वरूप आहे. मायेचं स्वरूप अनाकलनीय आहे. गीतातत्त्व त्याही पलीकडचं आहे.

हा वेदार्थसागर । जया निद्रिताचा घोर ।
तो स्वयें श्रीसर्वेश्वर । प्रत्यक्ष अनुवादला ।। ७२ ।।

हा वेदार्थसागर ज्याच्या निद्रिताचं घोरणं, तो सर्वेश्वर स्वत: इथे बोलला आहे. सर्वेश्वर हे विशेषण चिंतनीय आहे. ज्याचं घोरणं कळत नाही, त्याच्या जागृतीतील बोलणं काय समजेल?

ऐसें जें अगाध । जेथ वेडावती वेद ।
तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ।। ७३ ।।

असं ते गीतातत्त्व सखोल आहे. जिथे वेद ''वेडावती'' तिथं मी अल्प आणि मतिमंद असलेला कोण लागून गेलो?

हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें ।
गगन मुठीं सुवावें । मशकें केवीं ।। ७४ ।।

या अनाकलनीय तत्त्वाचं आकलन कसं व्हावं? महातेजाला कोणी अन् कशानं उजळावं? चिलटानं आपल्या मुठीत आकाश कसं धरावं?

परी एथ असे एक आधारू । तेणेंचि बोलें मी सधरू ।
जैं सानुकूळ श्रीगुरू । ज्ञानदेवो म्हणे ।। ७५ ।।

माउली म्हणतात, परंतु इथं एक आधार आहे. माझे श्रीगुरू निवृत्तिनाथ महाराज अत्यंत अनुकूल आहेत. त्यांच्यामुळेच मी धैर्यानं बोलत आहे.

येऱ्हवीं तरी मी मूर्ख । जरी जाहला अविवेक ।
तऱ्ही संतकृपादीपक । सोज्वळ असे ।। ७६ ।।

'जरी-तरी' शब्द समजून घेणं आवश्यक आहे. मूर्ख किंवा अविवेकी आहे, असं नाही. जर तरची भाषा आहे. जर मी मूर्ख किंवा अविवेकी आहे, असं वाटत असेल तर हरकत नाही. मी डोळस आहे हे महत्त्वाचं आहे. माझ्यापुढे संतकृपादीपक लखलखीत आहे. त्या प्रकाशात मला सर्व पाहता येतं.

लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे ।
कां मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धि ।। ७७ ।।

जरी प्रगटे सिद्धसरस्वती । तऱ्ही मुकया आथी भारती ।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ।। ७८ ।।

लोखंडाचं सोनं होतं, हे सत्य आहे; परंतु सोनं करण्याचं सामर्थ्य परिसामध्ये आहे. मृतही जिवंत होऊ शकतो, जर त्याला सिद्धामृत मिळालं तर. अथवा, साक्षात् सरस्वती वरदान देण्याकरिता जर सिद्ध झाली तर मुक्याला वाचा फुटेल. हे परिवर्तन सामर्थ्य वस्तूचं आहे. यात आश्चर्य करण्यासारखं काहीच नाही!

कां जयातें कामधेनु माय । तयासी अप्राप्य कांहीं आहे ।
म्हणऊनि मी प्रवर्तों लाहें । ग्रंथीं इये ।। ७९ ।।

अथवा ज्याची आई कामधेनू आहे, त्याला या जगात काय अप्राप्य आहे? माउली म्हणतात, श्रीगुरूंचा आधार असल्यानं मी गीतार्थात प्रवृत्त झालो.

तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।
करूनि घ्यावें हें तुमतें । विनवित असें ।। ८० ।।

माझ्या व्याख्यानात काही शब्द न्यून वाटत असेल, तर आपण पूर्ण करून समजून घ्यावे. अधिक व्याख्यान झाले तर ते मान्य करावे. हे गुरुदेव, आपण गोड करून स्वीकारावं ही विनंती करत आहे.

आतां देईजो अवधान । तुम्हीं बोलविला मी बोलेन ।
जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ।। ८१ ।।

तैसा मी अनुगृहीत । साधूंचा निरूपित ।
ते आपला अलंकारित । भलतयापरी ।। ८२ ।।

आता आपण अवधान द्या. तुम्ही जसे बोलवाल तसा मी बोलेन. दोरीच्या बाहुल्यांना सूत्रधार जसा नाचवील तसं नाचावं लागतं; किंबहुना नाचते. त्याचप्रमाणे मी आहे. माउली म्हणतात, मी आपला अनुगृहीत असून, संतांचा निरोप्या आहे. आज्ञाधारक आहे. तुम्ही मला आपल्यापरीनं अलंकृत करा. अनुगृहीत आणि संतांनी 'आपला' मानणं यातच शिष्याचं सर्वस्व असतं. आशीर्वाद वाणीत गोडवा आणतो.

तंव श्रीगुरु म्हणती राहीं । हें तुज बोलावें नलगें काही ।
आतां ग्रंथा चित्त देईं । झडकरी वेगां ।। ८३ ।।

ग्रंथ सांग, या आज्ञेची वाट पाहणाऱ्या माउलीला श्रीगुरू निवृत्तिनाथ महाराज म्हणतात, हे राहू दे, हे सर्व बोलण्याची तुला गरज नाही. आता ग्रंथाकडे चित्त दे आणि आम्हाला गीतार्थ लवकर सांग.

या बोला निवृत्तिदास । पावूनि परम उल्हास ।
म्हणे परिसा मना अवकाश । देऊनियां ।। ८४ ।।

या बोलण्यावर निवृत्तिदास, अतिशय उल्हासित होऊन म्हणाले, गुरुदेव, सावकाश मनानं ऐका. माउली स्वत:ला दास म्हणवून घेतात. आज्ञा झाल्याशिवाय दास कार्यारंभ करीत नाही. आज्ञेनंतरची जबाबदारी आज्ञा देणाऱ्याची असते. संतांचं मन हे समाधीतच असतं. त्याला सतत सावधान करावं लागतं. याशिवाय संतांच्या मनात देवाशिवाय काहीही नसतं. व्याख्यान ऐकण्यासाठी मनात थोडा अवकाश तर हवाच ना!

धृतराष्ट्र उवाच – **धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सव: ।**
मामका: पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय ।। १ ।।

धृतराष्ट्र म्हणाला, धर्मस्थान असलेल्या कुरुक्षेत्रात जमलेले, ज्यांना युद्धाची इच्छा आहे असे माझे व पांडूचे पुत्र काय करते झाले?

तरी पुत्रस्नेहें मोहित । धृतराष्ट्र असे पुसत ।
म्हणे संजया सांगें मात । कुरुक्षेत्रींची ।। ८५ ।।

माउलींच्या 'तरी' या शब्दात दुर्योधनाचं पूर्ण चरित्र आलेलं आहे. वस्त्रहरण, जुगार, कुळघातकी इत्यादीनं युक्त असणारा पुत्र, 'तरी' धृतराष्ट्र पुत्रप्रेमाने मोहित आहे. तो संजयला विचारतो, कुरुक्षेत्रीचं वर्तमान सांग.

जें धर्मालय म्हणिजे । तेथ पांडव आणि माझे ।
गेले असती व्याजें । जुंझाचेनि ।। ८६ ।।

तरी तिहीं येतुला अवसरीं । काय किजत असे येरयेरीं ।
तें झडकरी कथन करीं । मजप्रती ।। ८७ ।।

ज्या कुरुक्षेत्राला धर्मालय म्हणतात; तिथं पांडव आणि माझे पुत्र लढाईच्या निमित्तानं गेले आहेत. तरी ते यावेळी परस्परात काय करतात, हे लवकरात लवकर मला सांग.

संजय उवाच – **दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।**
आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत् ।। २ ।।

पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ।। ३ ।।

संजय म्हणाला, त्यावेळी राजा दुर्योधन पांडवांचं सैन्य व्यूहरचनेनं उभं पाहून गुरू द्रोणाचार्यांजवळ आला आणि म्हणाला, तुमचा बुद्धिमान शिष्य जो द्रुपदपुत्र आहे, त्यानं व्यूह रचून उभी केलेली पांडवांची मोठी सेना पाहा.

तिये वेळी तो संजय बोले । म्हणे पांडवसैन्य उचललें ।
जैसें महाप्रळयीं पसरलें । कृतांतमुख ।। ८८ ।।

तैसें ते घनदाट । उठावलें एकवाट ।
जैसे उसळलें काळकूट । धरी कवण ।। ८९ ।।

त्यावेळी तो संजय बोलला, हे खवळलेलं पांडवसैन्य पाहा, असं वाटतं जणू काही महाप्रलयाच्या वेळी मृत्यूची तोंडं सर्वत्र पसरावीत अशा प्रकारच्या घनदाट सैन्यानं एकदम उठाव केला. उसळलेलं काळकूट नावाचं विष कोणी धारण करावं.

ना तरी वडवानल सादुकला । प्रलयवातें पोखला ।
सागर शोषूनि उधवला । अंबरासी ।। ९० ।।

तैसें दळ दुर्धर । नानाव्यूहीं परिकर ।
अवगमलें भयासुर । तिये काळीं ।। ९१ ।।

जसं समुद्राच्या पोटात राहणारा वडवानळ अग्नी एकदम भडकावा. त्यात प्रलयाचा वारा साह्य झाला. सागराचं शोषण करून आकाशापर्यंत उसळला असं जाणवतंय. महाभयंकरपणा धारण केलेलं पांडवसैन्य अनेक प्रकारची व्यूहरचना करून उभं होतं. त्याच्यातील भयासूरपणा जाणवत होता.

तें देखोनि दुर्योधनें । अव्हेरिलें कवणें मानें ।
जैसें न गणिजे पंचाननें । गजघटांतें ।। ९२ ।।

ते पाहून सिंह जसा हत्तीच्या कळपाला जुमानत नाही, त्याप्रमाणे राजा दुर्योधन त्यांना जुमानत नाही.

मग द्रोणापासीं आला । तयातें म्हणे हा देखिला? ।
कैसा दळभार उचलला । पांडवांचा ।। ९३ ।।

गिरिदुर्ग जैसे चालते । तैसे विविध व्यूह भंवते ।
रचिले आथि बुद्धिमंतें । द्रुपदकुमरें ।। ९४ ।।

मग दुर्योधन द्रोणाचार्यांजवळ आला आणि म्हणाला, हे पांडवसैन्य पाहिलं का? कसं उसळलं आहे, जणू काही गिरिदुर्ग म्हणजे डोंगरी किल्ले चालत आहेत, असं वाटतं. सभोवार अनेक प्रकारच्या व्यूहरचना आहेत. अत्यंत बुद्धिमान असणाऱ्या द्रुपदपुत्राची ही व्यूहरचना आहे.

जो कां तुम्ही शिष्य आपुला । विद्येसि वसौटा केला ।
तेणें हा सैन्यासिंधु पाखरिला । देख देख ।। ९५ ।।

गुरुदेव, ज्याला आपण शिष्य केलं, विद्या देऊन विद्येचं कोठार केलं त्याच शिष्यानं आपल्या विरोधात पांडवसैन्य कसं पसरवलं ते पाहा. पुन्हा पुन्हा निरीक्षण करा.

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ।। ४ ।।

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ।
पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ।। ५ ।।

युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् ।।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः।। ६ ।।

या सेनेमध्ये भीमार्जुनासारखे महान योद्धे आहेत. त्यांची नावं पाहा :- युयुधान, विराट, द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, काशिराज, पुरुजित, कुन्तीभोज शैल्य, युधामन्यू, उत्तमौजा, अभिमन्यू आणि पाच द्रौपदीपुत्र हे सर्व महारथी आहेत.

आणीकही असाधारण । जे शस्त्रास्त्रीं प्रवीण ।
क्षात्रधर्मी निपुण । वीर आहाती ।। ९६ ।।

जे बळें प्रौढी पौरुषें । भीमार्जुनांसारिखे ।
ते सांगेन कौतुकें । प्रसंगेंचि ।। ९७ ।।

आणखीही काही असामान्य योद्धे आहेत जे शस्त्र, अस्त्रांत प्रवीण आहेत. क्षात्रधर्मात निष्णात असून, वीर आहेत. जे बळानं, मोठेपणानं, पराक्रमानं भीमार्जुनासारिखे आहेत. प्रसंग आलाच म्हणून त्यांची नावं कौतुकानं सांगतो.

एथ युयुधान सुभट । आला असे विराट ।
महारथी श्रेष्ठ । द्रुपद वीर ।। ९८ ।।

पांडवसैन्यात लढवय्या सात्यकी, विराट महारथी जे आहेत, त्यात श्रेष्ठ असणारा वीर द्रुपद आहे.

चेकितान धृष्टकेतु । काशिराज विक्रांतु ।
उत्तमौजा नृपनाथु । शैब्य देख ।। ९९ ।।

हा कुंतिभोज पाहें । एथ युधामन्यु आला आहे ।
आणि पुरजितादि राय हे । सकळ देख ।। १०० ।।

चेकितान, धृष्टकेतु, पराक्रमी विक्रांत, उत्तमौजा, नृपनाथ शैब्य, हा कुंतीभोज पाहा. इथे युधामन्यूदेखील आला आहे आणि पुरुजितादि सर्व राजांना पाहा.

हा सुभद्रा हृदयनंदन । जो अपर नवार्जुन ।
तो अभिमन्यु म्हणे दुर्योधन । देखें द्रोणा ।। १०१ ।।

दुर्योधन म्हणाला, हे आचार्य द्रोण, श्रीकृष्णाची बहीण सुभद्रा, तिच्या हृदयाला आनंद देणारा; किंबहुना हृदयातून जन्माला आलेला नंदन जो नवतरुण असा दुसरा अर्जुनच आहे.

आणीकही द्रौपदीकुमर । हे सकळही महारथी वीर ।
मिती नेणिजे परि अपार । मीनले असती ।। १०२ ।।

याशिवाय द्रौपदीचे पाच पुत्रही आले आहेत. हे सर्व वीर असून, महारथी आहेत. इतर महान

योद्धे आहेत ज्यांची मोजदाद करता येत नाही; परंतु एवढंच म्हणता येईल न मोजता येण्याइतके जमले आहेत.

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य सञ्ज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ।। ७ ।।

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जय: ।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ।। ८ ।।

आमच्या सैन्यामध्ये प्रमुख जे योद्धे आहेत ते लक्षात असावेत म्हणून त्यांची काही नावं सांगतो. तेदेखील सैन्याचे नेतेच आहेत. आपण स्वत: भीष्माचार्य, कर्ण, कृप, समितिंजय, अश्वत्थामा, विकर्ण त्याचप्रमाणे सौमदत्ती.

आतां आमुच्या दळीं नायक । जे रूढ वीर सैनिक ।
ते प्रसंगें आइक । सांगिजती ।। १०३ ।।

उद्देशें एक दोनी । जायिजती बोलोनी ।
तुम्ही आदिकरूनी । मुख्य जे जे ।। १०४ ।।

आता आमच्या सैन्यातील जे नायक आहेत, त्यांना प्रसंगानुसार सांगतो. तसे ते प्रसिद्ध योद्धे आहेत, तरीदेखील आपल्या लक्षात असावेत या हेतूनं सांगतो. मुख्यत्वे आपण आहात.

हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु ।
रिपुगजपंचाननु । कर्ण वीर ।। १०५ ।।

हा गंगेचा पुत्र भीष्म आहे जो प्रतापानं सूर्यच आहे. कर्ण म्हणजे शत्रूरूपी हत्तीला मारणारा सिंहच आहे.

एकेकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होय संहरे ।
हा कृपाचार्य न पुरे । एकलाचि ।। १०६ ।।

एकेकाच्या संकल्पमात्रानं या विश्वाचा नाश होऊ शकतो. जास्त काय बोलू, हा कृपाचार्य एकटाच पुरेसा आहे.

एथ विकर्ण वीर आहे । हा अश्वत्थामा पैल पाहें ।
याचा अडदर सदा वाहे । कृतांत मनीं ।। १०७ ।।

समितिंजय सौमदत्ति । ऐसे आणीक बहुत आहाती ।
जयांचिया बळा मिती । धाताही नेणे ।। १०८ ।।

इथे वीर विकर्ण आहे. पलीकडे अश्वत्थाम्याला पाहा. साक्षात यमदेखील यांची भीती मनात बाळगून आहे. समितिंजय, सौमदत्ती इत्यादी असे आणखीही वीर आहेत, ज्यांच्या बळाची,

सामर्थ्याची मर्यादा ब्रह्मदेवालाही माहीत नाही.

अन्ये च बहव: शूरा मदर्थे त्यक्तजीविता: ।
नानाशस्त्रप्रहरणा: सर्वे युद्धविशारदा: ।। ९ ।।

याशिवाय आणखी वीर आहेत जे माझ्याकरिता प्राण देणारे आहेत. अनेक शस्त्रांत, अस्त्रांत प्रवीण असून, सर्व जण युद्धकलेत विशारद आहेत.

जे शस्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त ।
हो कां जें अस्त्रजात । एथूनि रूढ ।। १०९ ।।

हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रताप आंगीं ।
परी सर्व प्राणें मजचिलागीं । आरायिले असती ।। ११० ।।

जे शस्त्रविद्येत निपुण आहेत, मंत्राचे मूर्तिमंत अवतार आहेत. जेवढी म्हणून अस्त्रं आहेत, ती यांच्यापासून प्रसिद्ध झाली आहेत. जगात यांना तोड नाही. पूर्ण शौर्यानं भरलेले आहेत. एवढे असून अंत:करणाने माझ्या बाजूनं आहेत.

पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचूनि न स्पर्शे ।
मी सर्वस्व यां तैसें । सुभटांसी ।। १११ ।।

पतिव्रतेचं हृदय ज्याप्रमाणे पतिशिवाय दुसऱ्याला स्पर्श करीत नाही, त्याप्रमाणे या योद्ध्यांसाठी मीच सर्वस्व आहे.

आमुचिया काजाचेनि पाडें । देखती आपुलें जीवित्व थोकडें ।
ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्त ।। ११२ ।।

आमच्या कार्यापुढे यांना आपलं जीवनदेखील तुच्छ वाटतं. असे हे एकनिष्ठ असून, उत्तम स्वामिभक्त आहेत.

जुंझती कुळकणी जाणती । कळे कीर्तीसी जिती ।
हे बहु असो क्षात्रनीती । एथोनियां ।। ११३ ।।

युद्धातील सूक्ष्मता जाणतात. युद्धात चातुर्याचा उपयोग करून कीर्तीला जिंकतात. जास्त काय सांगावे, क्षात्रधर्म येथूनच प्रारंभ झाला आहे.

ऐसे सर्वांपरी पुरते । वीर दळीं आमुतें ।
आतां काय गणूं यांतें । अपार हे ।। ११४ ।।

सर्वांगानं परिपूर्ण योद्धे आमच्या सैन्यात आहेत. किती मोजावेत? एवढंच सांगतो, हे अपार आहे.

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ।। १० ।।

सेनापती भीष्माचार्यांद्वारे आमचं सैन्य सुरक्षित असून अपार आहे. पांडवांचं सैन्य भीमाकडून सुरक्षित आहे. संख्या मात्र कमी आहे.

वरी क्षत्रियांमाजि श्रेष्ठ । जो जगजेठी जगीं सुभट ।
तया दळवैपणाचा पाट । भीष्मासि पैं ।। ११५ ।।

क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ आणि युद्धातही उत्कृष्ट लढवय्ये असणारे असे भीष्माचार्य; त्यांना सेनापतीचा अधिकार देण्यात आला आहे.

आतां याचेनि बळें गवसलें । हें दुर्ग जैसें पन्नासिलें ।
येणें पाडें थेंकुलें । लोकत्रय ।। ११६ ।।

भीष्माचार्यांच्या अधिपत्याखाली संपूर्ण सैन्य असल्यामुळे, त्यांनी अशी व्यूहरचना केली, जणू काही किल्लेच बांधले आहेत. यांच्यासमोर त्रैलोक्यदेखील सामान्य वाटतं.

आधींच समुद्र पाहीं । तेथ दुवाडपण कवणा नाहीं ।
मग वडवानळ तैसेयाही । विरजा जैसा ।। ११७ ।।

ना तरी प्रलयवन्हि महावात । या दोघां जैसा संघात ।
तैसा हा गंगासुत । सेनापति ।। ११८ ।।

अगोदर समुद्र मोठा, त्यात तो भीतिदायक. पुन्हा आत वडवानळ अग्नी विराजमान; अथवा प्रलय आणि सोसाट्याचा वारा या दोघांचा मिलाप म्हणजे गंगापुत्र भीष्माचार्य होत.

आतां येणेसीं कवण भिडे । हें पांडवसैन्य कीर थोकडें ।
वरचिलेनि पाडें । दिसत असे ।। ११९ ।।

आता या भीष्मासी कोण लढू शकेल? अथवा या भीष्मासहित सैन्यासी कोण लढू शकेल? पांडवांचे सैन्य थोडं आहे. याशिवाय आमच्या मानानं सामान्य आहे.

वरी भीमसेन बेथु । तो जाहला असे सेनानाथु ।
ऐसें बोलोनिया मातु । सांडिली तेणें ।। १२० ।।

याशिवाय भीम हा आडदांड आहे. तो यांचा सेनापती आहे. एवढं बोलून दुर्योधनानं आपलं सांगणं बंद केलं.

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिता: ।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्त: सर्व एव हि ।। ११ ।।

आपल्याला जिथे जिथे नेमलं आहे तिथे तिथे आपण उभं राहावं. सर्वांनी सर्व बाजूनं भीष्माचंच रक्षण करावं.

मग पुनरपि काय बोले । सकळ सैनिकांतें म्हणितलें ।
आतां दळभार आपुलाले । सरसे करा ।। १२१ ।।

जया जिया अक्षौहिणी । तेणें तिया आरणी ।
वरगण कवणकवणी । महारथिया ।। १२२ ।।

मग दुर्योधन पुन्हा बोलला, 'सर्व सैन्य सज्ज करा,' असा आदेशही त्यांनी उपसेनापतींना दिला. ज्यांच्या नेतृत्वाखाली ज्या सैन्य तुकड्या असतील त्यांनी त्या महारथींच्या स्वाधीन कराव्यात.

तेणें तिया आवरिजे । भीष्मातळीं राहिजे ।
द्रोणातें म्हणे पाहिजे । तुम्ही सकळ ।। १२३ ।।

त्या महारथीने त्या तुकडीला नियंत्रणात ठेवावे. सर्वांनी भीष्माचार्यांची आज्ञा पाळावी. दुर्योधन द्रोणाचार्यांना म्हणाला, आपण हे व्यवस्थित आहे की नाही हे पाहावं.

हाचि एक रक्षावा । मी तैसा हा देखावा ।
येणें दळभार आघवा । साच आमुचा ।। १२४ ।।

सर्वांनी भीष्माचं रक्षण करावं. माझ्याप्रमाणेच यांना मानावं. भीष्माचार्यांमुळेच आपलं सैन्य समर्थ आहे.

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्ध: पितामह: ।
सिंहनादं विनद्योच्चै: शङ्खं दध्मौ प्रतापवान् ।। १२ ।।

दुर्योधनाला हर्ष उत्पन्न व्हावा म्हणून कुरुकुळातील सर्वांत वृद्ध, पितामह भीष्मानं मोठ्यानं सिंहनाद केला, युद्धाची घोषणा म्हणून शंख वाजविला.

या राजयाचिया बोला । सेनापति संतोषला ।
मग तेणें केला । सिंहनाद ।। १२५ ।।

राजा दुर्योधनाच्या बोलण्यानं सेनापती भीष्म प्रसन्न झाले. मग त्यांनी सिंहगर्जना केली.

तो गाजत असे अद्‌भुत । दोहीं सैन्यांआंत ।
प्रतिध्वनि न समात । उपजत असे ।। १२६ ।।

तयाचि तुलगासवें । वीरवृत्तीचेनि थावें ।
दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला ।। १२७ ।।

भीष्माचार्यांची सिंहगर्जना दोन्ही सैन्यांत दुमदुमली. तो सिंहनाद अद्‌भुत असल्यानं त्याचा प्रतिध्वनी सतत येत होता. त्याच जोमानं, वीरवृत्तीनं भीष्माचार्यांनी दिव्य शंख वाजविला.

ते दोन्ही नाद मिनले । तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें ।
जैसें आकाश कां पडिलें । तुटोनियां ।। १२८ ।।

घडघडीत अंबर । उचंबळत सागर ।
क्षोभले चराचर । कांपत असे ।। १२९ ।।

सिंहनाद आणि शंखनाद एकत्रित मिळाल्यामुळे त्रैलोक्याच्या कानठळ्या बसल्या. जणू काही आकाश तुटून पडलं, असा भास झाला. आकाश धडाडलं. सागर उसळला. चराचर घाबरले, कंप निर्माण झाला.

तेणें महाघोषगजरें । दुमदुमिताती गिरिकंदरें ।
तंव दळामाजि रणतुरें । आस्फुरिलीं ।। १३० ।।

त्या महाघोषाच्या सतत गजरानं डोंगरातील दऱ्या दणाणू लागल्या. तेवढ्यात सैन्यामध्ये रणवाद्यं वाजू लागली.

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ।। १३ ।।

त्यानंतर शंख, नगारे, ढोल, झांजा, तुताऱ्या, मृदंग इत्यादी वाद्यं एकदम वाजविण्यात आली. त्यांचा आवाज फार भयंकर झाला.

उदंड सैंघ वाजतें । भयानकें खाखातें ।
महाप्रळय जेथें । धोकडांसी ।। १३१ ।।

नाना प्रकारची वाद्यं सर्वत्र वाजू लागली. भयानक आणि कर्कश आवाजानं धैर्यशील लोकांनाही प्रलयकाळ वाटला.

भेरी निशाण मांदळ । शंख काहळा भोंगळ ।
आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ।। १३२ ।।

आवेशें भुजा त्राहाटिती । विसणेले हांका देती ।
जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ।। १३३ ।।

त्या वाद्यात ढोल, नौबती, शंख, मृदंग इत्यादी होते. याशिवाय मोठमोठ्या योद्ध्यांचे कर्कश आवाज होते. ते आवेशात दंड थोपटू लागले. समोरच्याला जोरजोरात आव्हान देऊ लागले. विचित्र आवाजामुळे मदोन्मत्त हत्तीदेखील सैरावैरा पळू लागले.

तेथ भेडांची कवण मात । कांचया केर फिटत ।
जेणें दचकला कृतांत । आंग नेघे ।। १३४ ।।

तिथे भित्र्याची काय कथा. कच्चे तर पाचोळ्यासारखे उडाले. त्या महानादानं यमदेखील हादरला. तो येण्याचं धाडसच करेना.

एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले ।
बिरुदाचे दादुले । हिंवताती ।। १३५ ।।

ऐसा अद्भुत तूरबंबाळ । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळ ।
देव म्हणती प्रळयकाळ । वोढवला आजी ।। १३६ ।।

काहींचे उभ्या उभ्याच प्राण गेले. मी मी म्हणविणाऱ्या धैर्यवानांची दातखिळ बसली. रणधुरंधरादी पदवी मिरविणारे थरथर कापू लागले. असा अद्भुत ध्वनी ऐकून ब्रह्मदेव व्याकुळ झाला. इंद्रादिक देव म्हणू लागले, आज प्रलयकाळ येऊन ठेपला आहे, असं वाटतं.

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ।। १४ ।।

त्यानंतर पांढरे घोडे जोडलेल्या महान रथावर आरूढ झालेले श्रीकृष्ण आणि अर्जुन यांनी आपले दिव्य शंख वाजविले.

ऐसी स्वर्गीं मात । देखोनि तो आकांत ।
तंव पांडवदळाआंत । वर्तलें कायी ।। १३७ ।।

असं स्वर्गात देवादिकांना वाटत असतानाच पांडवदळात काय झालं ते पाहा.

हो कां निजसार विजयाचे । कीं तें भांडार महातेजाचें ।
जेथ गरुडाचिये जावळिचे । कांतले चाऱ्ही ।। १३८ ।।

जो रथ विजयाचा आत्मा आहे. महातेजाचं जणू काही भांडार आहे. ज्याला गरुडाची बरोबरी करणारे चार पांढरे घोडे जुंपले आहेत.

कीं पाखांचा मेरु जैसा । रहंवर मिरवतसे तैसा ।
तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ।। १३९ ।।

जेथ अश्ववाहक आपण । वैकुंठींचा राणा जाण ।
तया रथाचे गुण । काय वर्णूं ।। १४० ।।

असं वाटतं जणू काही तो पंखाचा महामेरूच आहे. त्याच्या तेजानं सर्व दिशा भरून गेल्या आहेत. ज्या रथाचे अश्ववाहक स्वत: वैकुंठीचा राजा श्रीकृष्ण आहेत, त्या रथाचं गुण काय वर्णन करू?

ध्वजस्तंभावरी वानर । तो मूर्तिमंत शंकर ।
सारथी शार्ङ्गधर । अर्जुनेंसीं ।। १४१ ।।

ज्या रथाच्या ध्वजस्तंभावर मारुती आहे, तो साक्षात भगवान शंकर आहे. अर्जुनाचा जो सारथी आहे तो शार्ङ्गधर आहे. शार्ङ्गधर हे भगवान विष्णूचं नाव आहे.

देखा नवल तया प्रभूचें । अद्भुत प्रेम भक्ताचें ।
जे सारथ्यपण पार्थाचें । करीत असे ।। १४२ ।।

आश्चर्य पाहा, भक्ताविषयी असलेल्या अद्‌भुत प्रेमामुळे प्रभू अर्जुनाचं सारथ्य करीत आहेत.

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जय: ।
पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदर: ।। १५ ।।

भगवान श्रीकृष्णानं पांचजन्य शंख वाजविला. अर्जुनानं देवदत्त, अचाट कर्म करणाऱ्या भीमानं पौंड्र नावाचा शंख वाजविला.

पाइक पाठीसीं घातला । आपण पुढां राहिला ।
तेणें पांचजन्य आस्फुरिला । अवलीळाचि ।। १४३ ।।

परी तो महाघोष थोरु । गर्जत असे गंहिरु ।
जैसा उदेला लोपी दिनकरु । नक्षत्रांतें ।। १४४ ।।

दासाला मागं घातलं आणि आपण स्वत: भगवान श्रीकृष्णांनी पुढं राहून पांचजन्य नावाचा शंख वाजविला. सहजतेनं वाजविलेल्या शंखाचा आवाज गंभीर होता. सूर्याच्या उदयानं नक्षत्र हारपतात त्याप्रमाणे त्या आवाजानं इतर सर्व आवाज दाबले गेले.

तैसे तूरबंबाळ भंवते । कौरवदळीं गाजत होते ।
ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ।। १४५ ।।

तैसाचि देखें येरें । निनादें अतिगजरें ।
देवदत्तं धनुर्धरें । आस्फुरिला ।। १४६ ।।

कौरवसैन्यातील सर्व आवाज हरपले. तिथेच त्या अर्जुनानं देवदत्त नावाचा शंख अतिशय गंभीरतेनं वाजविला.

ते दोनी शब्द अचाट । मिनले एकवट ।
तेथ ब्रह्मकटाह शतकूट । हों पाहत असे ।। १४७ ।।

पांचजन्य आणि देवदत्त या शंखांचे आवाज एकत्रित झाले. या आवाजानं ब्रह्मांडाचे शंभर तुकडे होऊ पाहात होते.

तंव भीमसेन विसणेला । जैसा महाकाळ खवळला ।
तेणें पौंड्र आस्फुरिला । महाशंख ।। १४८ ।।

तो आवाज ऐकून भीम आवेशात आला. जणू काय महाकाळच खवळला. त्यानं पौंड्र नावाचा शंख वाजविला.

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ।। १६ ।।

कुंतीपुत्र राजा युधिष्ठिरानं अनंतविजय, नकुलानं सुघोष, सहदेवानं मणिपुष्पक नावाचे शंख वाजविले.

तो महाप्रलयजलधर । जैसे गडगडीत गंहिर ।
तंव अनंतविजय युधिष्ठिर । आस्फुरित असे ।। १४९ ।।

नकुळें सुघोष । सहदेवें मणिपुष्पक ।
जेणें नादें अंतक । गजबजला ठाके ।। १५० ।।

प्रलय काळातील मेघगर्जनेप्रमाणे भीमाच्या शंखाचा आवाज होत असतानाच युधिष्ठिरानं अनंतविजय नावाचा शंख वाजविला. नकुलानं सुघोष, तर सहदेवानं मणिपुष्पक नावाचे शंख वाजविले. त्या नादानं साक्षात यम हादरला.

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ।। १७ ।।

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक् ।। १८ ।।

मोठा धनुर्धारी काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, पराजित न होणारा सात्यकी, द्रुपद आणि द्रौपदीपुत्र, अभिमन्यू तथा इतर सर्व राजांनी वेगवेगळे शंख सर्व परिसरात वाजविले.

तेथ भूपती होते अनेक । द्रुपद द्रौपदेयादिक ।
हा काशीपति देख । महाबाहू ।। १५१ ।।

तेथ अर्जुनाचा सुत । सात्यकि अपराजित ।
धृष्टद्युम्न नृपनाथ । शिखंडी हन ।। १५२ ।।

विराटादि नृपवर । जे सैनिक मुख्य वीर ।
तिहीं नाना शंख निरंतर । आस्फुरिले ।। १५३ ।।

पांडवसैन्यात अनेक भूपती होते. द्रुपद व द्रौपदीच्या पाच पुत्रांसह हा काशिराज पाहा. तिथेच महाबाहू अर्जुनपुत्र अभिमन्यू आहे. सात्यकी राजा धृष्टद्युम्न तथा शिखंडी जो महारथी आहे, त्यासह विराटादि राजांनी, तथा प्रमुख सैनिकांनी अनेक प्रकारचे शंख वाजविले.

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ।। १९ ।।

पृथ्वी आणि गगन यांना भेदणारा शंखांचा आवाज ऐकून कौरवांची हृदयं विदीर्ण झाली.

तेणें महाघोषनिर्घातें । शेष कूर्म अवचितें ।
गजबजोनि भूभारातें । सांडूं पाहती ।। १५४ ।।

त्या मोठ्या आवाजाच्या धक्क्यानं शेष आणि कूर्म एकाएकी डळमळले. घाबरल्यामुळे भूभार सोडून देण्याची अवस्था झाली.

तेथ तिन्ही लोक डळमळित । मेरु मांदार आंदोलत ।
समुद्रजळ उसळत । कैलासवरी ।। १५५ ।।

पृथ्वीतळ उलथों पहात । आकाश असें आसुडत ।
तेथ सडा होत । नक्षत्रांचा ।। १५६ ।।

मोठ्या आवाजानं तीन लोक डळमळू लागले. मेरू आणि मांदार पर्वत डोलू लागले. समुद्राच्या लाटा कैलासपर्यंत उसळल्या. पृथ्वीतळ उलथू पाहत होते. आकाशाला हिसके बसल्यामुळे नक्षत्रांचा सडा पडत होता.

सृष्टि गेली रे गेली । देवां मोकळवादी जाहली ।
ऐसी एक टाळी पिटिली । सत्यलोकीं ।। १५७ ।।

देवांनी हंबरडा फोडला. म्हणू लागले, 'सृष्टी संपली रे संपली.' देवादिकांना आश्रयरहितपणा जाणवला. सत्यलोकात एकच आरडाओरडा झाला. अर्थात, आवाजाचा परिणाम भयंकर झाला.

दिहाचि दिन थोकला । जैसा प्रळयकाळ मांडला ।
तैसा हाहाकार जाहला । तिहीं लोकीं ।। १५८ ।।

दिवसाच सूर्य थांबला. ज्याप्रमाणे प्रलयकाळी हाहाकार व्हावा तसा तिन्ही लोकांत आरडाओरडा सुरू झाला.

तें देखोनि आदिपुरुष विस्मित । म्हणे झणें होय पा अंत ।
मग लोपला अद्भुत । संभ्रम तो ।। १५९ ।।

म्हणोनि विश्व सांवरलें । एव्हवीं युगान्त होतें वोढवलें ।
जैं महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकीं ।। १६० ।।

हे सर्व पाहून आदिपुरुष आश्चर्यचकित झाला. म्हणाला खरोखरच सृष्टीचा अंत होतो की काय? मग एकदम आवेशात येऊन तो आवाज अद्‌भुततेनं लोपविला म्हणून हे विश्व सावरले. नाही तर कृष्णादिकांच्या शंखध्वनीनं अनर्थ ओढवला असता. युगांताची अवस्था आली होती.

तो घोष तरी उपसंहरला । परी पडिसाद होता राहिला ।
तेणें दळभार विध्वंसिला । कौरवांचा ।। १६१ ।।

जैसा गजघटाआंत । सिंह लीला विदारित ।
तैसा हृदयातें भेदित । कौरवांचिया ।। १६२ ।।

आदिपुरुषाने ध्वनी आवरले खरे; परंतु त्याचा प्रतिध्वनी होत होता. त्या प्रतिध्वनीनं कौरवसेनेच्या व्यूहरचनेची दाणादाण उडाली. ज्याप्रमाणे हत्तीच्या कळपात शिरून सिंह सहजरीत्या त्यांना फाडतो त्याप्रमाणे केवळ प्रतिध्वनीनं कौरवांच्या हृदयाला विदीर्ण केलं.

तो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हिये घालिती ।
एकमेकांतें म्हणती । सावध रे सावध ।। १६३ ।।

तो प्रतिध्वनी उमटताना जेव्हा ऐकला तेव्हा उभ्या उभ्याच धैर्य सुटत होतं. हृदय ढिलं होत होतं. अंगात उसनं अवसान आणून एकमेकांना 'सावध व्हा रे! सावध व्हा' असं म्हणत होतं.

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पाण्डवः ।। २० ।।

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
अर्जुन उवाच – **सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ।। २१ ।।**

सर्व कौरवसैन्य सावरलेलं पाहून शस्त्र चालवण्यास प्रारंभ होत असता, अर्जुन धनुष्य हातात उचलून श्रीकृष्णाला म्हणाला, 'हे अच्युत, माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा कर.'

तेथ बळप्रौढीपुरते । महारथी वीर होते ।
तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ।। १६४ ।।

मग सरिसेपणें उठावले । दुणवटोनि उचलले ।
तया दंडीं क्षोभलें । लोकत्रय ।। १६५ ।।

तिथे जे शक्तियुक्त धैर्याने महारथी उभे होते, त्यांनी सैन्याला पुन्हा आवरलं. मग ते सैन्य युद्धासाठी तयार झालं. दुप्पट आवेशानं तयार झालेलं पाहून त्रैलोक्य त्रस्त झालं. धाक तयार झाल्यामुळे संतुलन राहिलं नाही.

तेथ बाणवरी धनुर्धर । वर्षताति निरंतर ।
जैसे प्रळयांत जलधर । अनिवार कां ।। १६६ ।।

ते देखिलिया अर्जुनें । संतोष घेऊनि मनें ।
मग संभ्रमें सेने । दिठी घालीतसे ।। १६७ ।।

ज्याप्रमाणे प्रलयकारी मेघांचा अखंड वर्षाव चालू असतो, त्याप्रमाणे धनुर्धर सतत बाणवर्षाव करीत होते. ते अर्जुनानं पाहिलं. मनाला संतोष झाला. मोठ्या उत्सुकतेनं कौरवसैन्यावर दृष्टी फेकली.

तंव संग्रामीं सज्ज जाहले । सकळ कौरव देखिले ।
तंव लीला धनुष्य उचलिलें । पंडुकुमरें ।। १६८ ।।

ते वेळीं अर्जुन म्हणतसे देवा । आतां झडकरी रथ पेलावा ।
नेऊनि मध्यें घालावा । दोहीं दळां ।। १६९ ।।

तेव्हा युद्धासाठी सज्ज झालेलं सर्व कौरवसैन्य पाहिलं. मग अर्जुनानं सहजरीत्या आपलं धनुष्य उचललं. त्यावेळी अर्जुन म्हणाला, 'देवा! आता लवकर रथ हाकावा, दोन्ही सैन्याच्या मध्यभागी उभा करावा.'

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ।। २२ ।।

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागता: ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षव: ।। २३ ।।

युद्धाच्या इच्छेनं समोर उभ्या असलेल्यांचं मी तोपर्यंत निरीक्षण करतो. या युद्धामध्ये मी कोणाबरोबर युद्ध करावं हे तर पाहिलं पाहिजे ना! युद्धाची इच्छा करणारे आणि दुर्बुद्धी दुर्योधनाचं प्रिय करण्याची इच्छा असलेले, असे सर्व इथे एकत्रित झाले आहेत.

जंव मी नावेक । हे सकळ वीर सैनिक ।
न्याहाळीन अशेख । जुंझते जे ।। १७० ।।

देवा, झुंजण्याकरिता आलेल्या सर्व वीर सैनिकांना जोपर्यंत मी न्याहाळून पाहात नाही, तोपर्यंत दोन्ही सैन्याच्या मध्यभागी रथ उभा कर.

एथ आले असती आघवे । परी कवणेंसीं म्यां जुंझावें ।
हें रणीं लागे पहावें । म्हणऊनियां ।। १७१ ।।

इथे तर सर्वच आले आहेत; परंतु मी कोणाबरोबर युद्ध करावं, हे अगोदर पाहावं लागेल.

बहुतकरूनि कौरव । हे आतुर दु:स्वभाव ।
वांटिवावीण हांव । बांधिती जुंझीं ।। १७२ ।।

जास्त करून हे कौरव उतावळे आहेत. दुष्ट स्वभावाचे आहेत. पराक्रमी, धैर्यवान नसतानादेखील युद्ध करण्याची हौस आहे.

जुंझाची आवडी धरिती । परी संग्रामीं धीर नव्हती ।
हें सांगोनि रायाप्रती । काय संजयो म्हणे ।। १७३ ।।

लढण्याची आवड आहे; परंतु युद्धात टिकाव धरीत नाही. इतकं सांगून संजय धृतराष्ट्राला काय म्हणाला.

संजय उवाच – **एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।**
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापियित्वा रथोत्तमम् ।। २४ ।।

भीष्मद्रोणप्रमुखत: सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ।। २५ ।।

संजय म्हणाला, हे राजा, अर्जुन असं बोलल्यावर श्रीकृष्णानं दोन्ही सैन्याच्या मध्यभागी विशेषकरून भीष्म, द्रोण इत्यादी प्रमुखांसमोर रथ उभा केला. भगवंत म्हणाले, हे पार्था, जमलेल्या या कौरवांना पाहा.

आइका अर्जुन इतुकें बोलिला । तंव श्रीकृष्णें रथ पेलिला ।
दोहीं सैन्यांमाजि केला । उभा तेणें ।। १७४ ।।

जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिकेचि सन्मुख ।
पृथिवीपति आणिक । बहु आहाती ।। १७५ ।।

ऐका, अर्जुनाचं बोलणं संपल्यावर श्रीकृष्णानं रथ हाकलला. दोन्ही सैन्याच्या मध्यभागी उभा केला. जवळच भीष्म, द्रोण उभे होते. त्यांच्या शेजारी अनेक प्रमुख राजेही होते.

तेथ स्थिर करूनियां रथ । अर्जुन असे पाहत ।
तो दळभार समस्त । संभ्रमेंसीं ।। १७६ ।।

त्या ठिकाणी रथ थांबविला. अर्जुन सर्वांना औत्सुक्यानं पाहू लागला.

तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ।। २६ ।।

श्वशुरान् सुहृदश्चैव सेनायोरुभयोरपि ।
तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान् ।। २७ ।।

तिथे जमलेल्यांमध्ये आजोबा भीष्म होते. गुरू द्रोण आणि शल्यादि मामा होते. युधिष्ठिर, भीम आदि बंधू होते. अभिमन्यू, द्रौपदेयादिपुत्र होते. सासरा द्रुपद, कृतवर्मादि मित्र होते. दोन्ही सैन्यांत नातेवाईकच आहेत असं पाहिल्यामुळे,

मग देवा म्हणे देख देख । हे गोत्रगुरु अशेख ।
तंव कृष्णा मनीं नावेक । विस्मो जाहला ।। १७७ ।।

तो आपणयां आपण म्हणे । एथ कायी कवण जाणे ।
हें मनीं धरिलें येणें । परी कांहीं आश्चर्य असे ।। १७८ ।।

मग अर्जुन देवांना म्हणाला, पाहा! पाहा! हे सर्व नातेवाईक आणि गुरू आहेत. हे ऐकून श्रीकृष्णाच्या मनाला क्षणभर आश्चर्य वाटलं. मनातल्या मनात स्वत:ला म्हणाले, का कोणास ठाऊक यानं यावेळी हे काय मनात आणलं? जे आणलं ते आश्चर्यकारक आहे.

ऐसी पुढील से घेत । तो सहजें जाणे हृदयस्थ ।
परी उगा असे निवांत । तिये वेळीं ।। १७९ ।।

पुढचा अंदाज बांधत भगवान श्रीकृष्ण त्यावेळेस शांत राहिले. तो सर्वांच्या हृदयात राहणारा हृदयस्थ आहे. त्याला सर्व माहीत आहे, तरीही त्यांनी न बोलणं उचित समजलं.

तंव तेथ पार्थ सकळ । पितृ पितामह केवळ ।
गुरु बंधु मातुळ । देखता जाहला ।। १८० ।।

इष्ट मित्र आपुले । कुमरजन देखिले ।
हे सकळ असती आले । तयांमाजी ।। १८१ ।।

त्यावेळेस पार्थानं योद्धे म्हणून न पाहता चुलते, आजोबा, गुरू, बंधू, मामा इत्यादी रूपानं पाहू लागला. आवडते नातेवाईक, मुलांना पाहिलं. त्यांना सहभागी असलेलं पाहिलं.

सुहृज्जन सासरे । आणीकही सखे सोइरे ।
कुमर पौत्र धनुर्धरे । देखिले तेथ ।। १८२ ।।

सहृदयी मित्रमंडळ, सासरे, सामान्य मित्रजन, नातू इत्यादी सर्वांना अर्जुन पाहता झाला.

जयां उपकार होते केले । कीं आपदीं जे रक्षिले ।
हें असो वडिल धाकुले । आदिकरुनी ।। १८३ ।।

ऐसें गोत्रचि दोहीं दळीं । उदित जालेंअसे कळीं ।
हें अर्जुनें तिये वेळीं । अवलोकिलें ।। १८४ ।।

ज्यांच्यावर उपकार केले होते किंवा ज्यांना संकटातून सोडवलं होतं, अशा लहान-थोर आदिकरून सर्वांना पाहिलं. एकंदरीत दोन्ही सैन्यात आपले सख्खे, चुलत असे नातेवाईकच आहेत. दोन्ही एकमेकांशी युद्ध करण्यासाठी उत्सुक आहेत असं दृश्य अर्जुनानं पाहिलं.

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

अत्यंत करुणेने व्याप्त, खिन्न अंत:करणाने अर्जुन बोलू लागला.

तेथ मनीं गजबज जाहली । आणि आपैसी कृपा उपजली ।
तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ।। १८५ ।।

योद्धे न पाहता नातेवाईक पाहिल्यामुळे मग मनात गजबज झाली. गजबज म्हणजे गोंधळलेली अवस्था. त्यात आपोआप मनात कृपा झाली. कृपेला सवत मानून वीरवृत्ती अपमानानं निघून गेली.

चिंतन – गीतेमध्ये 'उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान्कुरूनिति' म्हणजे भगवंत म्हणाले, ''या जमलेल्या कौरवांना तू पाहा'' असं आहे; परंतु ज्ञानेश्वरीत हा अनुवाद नाही. भीष्मद्रोणादि प्रमुखांपुढे रथ स्थिर केला, एवढंच म्हटलं आहे.

जिया उत्तमकुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथी ।
तिया आणिकीतें न साहती । सुतेजपणें ।। १८६ ।।

ज्या स्त्रिया उत्तम कुळातल्या असतात आणि सद्‌गुणानं, सौंदर्यानं परिपूर्ण असतात त्या स्वत:च्या स्वाभिमानामुळे दुसऱ्या स्त्रीचं वर्चस्व सहन करत नसतात.

नविये आवडीचेनि भरें । कामुक निजवनिता विसरे ।
मग पाडेंविण अनुसरे । भ्रमला जैसा ।। १८७ ।।

कामी पुरुष, नव्या स्त्रीच्या आवडीनं; किंबहुना प्रेमाच्या भरात आपल्या पत्नीला विसरतो. ती सामान्य असते; परंतु तिची योग्यता न पाहता स्वत:ची योग्यता विसरून भ्रमिष्ट होतो.

कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी ।
मग तया विरक्ततासिद्धी । नाठवे ती ।। १८८ ।।

अथवा तपोबळाने ऋद्धी प्राप्त झाली असता साधकाची बुद्धी भ्रंश पावते. ज्या वैराग्यसहित तपामुळे ऋद्धी आलेली असते, ती वैराग्यदशा हा साधक विसरून जातो. ऋद्धी म्हणजे सतत ऐश्वर्यात वाढ होवो.

तैसें अर्जुना तेथ जाहलें । असतें पुरुषत्व गेलें ।
जे अंत:करण दिधलें । कारुण्यासी ।। १८९ ।।

त्याप्रमाणे अर्जुनाची अवस्था झाली. ज्या वीरवृत्तीमुळे अर्जुनाला मान होता, ती गेली आणि कृपा आली. त्याचा परिणाम असलेलं पुरुषत्व गेलं; कारण आपलं हृदय कारुण्याला, कृपेला दिलं.

देखा मंत्रज्ञ बरळ जाय । तेथ कां जैसा संचार होय ।
तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला ।। १९० ।।

मंत्रनिष्णात व्यक्ती मंत्रोच्चारात प्रमाद करीत असेल, तर त्यालाच भूतबाधा होते. संचार होतो. संचार म्हणजे मानसिक संतुलन बिघडतं, तिथं तुमच्या बोलण्याला किंमत राहत नाही. काय बोलता यापेक्षा तुमची अवस्था ठीक नाही, हे जाणवतं. ठीक अर्जुनाचं तसं झालं. महामोहाचा संचार झाला.

म्हणौनि असता धीर गेला । हृदया द्रव आला ।
जैसा चंद्रकरीं शिंपिला । सोमकांत ।। १९१ ।।

तयापरी पार्थ । अतिस्नेहें मोहित ।
मग सखेद असे बोलत । श्रीअच्युतेंसीं ।। १९२ ।।

संचार झाल्यामुळे धैर्य गेलं. हृदय करुणेनं पाझरलं. ज्याप्रमाणे चंद्रकिरणांचा स्पर्श झाल्यावर चंद्रकांत मणी पाझरू लागतो, त्याप्रमाणे नातेवाईक, आप्तेष्ट, गुरू इत्यादिकांच्या अतिप्रेमामुळे

मोहित झाला. मग सखेद, दु:खी अंत:करणाने पार्थ भगवंताला बोलू लागला. 'मुह्' धातूपासून 'मोह' शब्द तयार होतो. एकंदरीत माउलींच्या दृष्टांताच्या ओव्या पाहिल्या, तर 'वेडं होणं' हाच भाव जाणवतो. मनी गजबज झाल्यामुळे महामोहाचा संचार झाला. मोहित असणाऱ्या अर्जुनाचं बोलणं पुढीलप्रमाणे असतं.

अर्जुन उवाच – **दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।। २८ ।।**

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।। २९ ।।

गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।
न च शन्कोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मन: ।। ३० ।।

युद्धाच्या इच्छेनं जमलेल्या स्वजनांना पाहून अर्जुन म्हणाला, 'माझी गात्रं शिथिल होत आहेत. माझं तोंड कोरडं पडत आहे. माझं शरीर थरथरतं. माझ्या अंगावर शहारे आले आहेत. हातातून गांडीव धनुष्य गळून पडत आहे. त्वचेचा दाह होत आहे. माझं मन फिरत आहे. स्थिर नाही. मी उभा राहण्यास असमर्थ आहे.'

तो म्हणे अवधारीं देवा । म्यां पाहिला हा मेळावा ।
तंव गोत्रवर्ग आघवा । देखिला एथ ।। १९३ ।।

हे संग्रामीं उदित । जाहाले असती कीर समस्त
पण आपणयां उचित । केवीं होय ।। १९४ ।।

अर्जुन म्हणतो 'देवा, ऐका. मी हा समुदाय पाहिला. इथे तर सर्व गोत्रवर्ग आहे. हे सर्व युद्धासाठी उत्सुक आहेत हे निश्चित; परंतु हे आपल्याला शोभेल का?'

येणें नांवेंचि नेणों कायी । मज आपणपें सर्वथा नाहीं ।
मन बुद्धी ठायीं । स्थिर नोहे ।। १९५ ।।

सगोत्र आणि नातेवाईक यांच्याबरोबर युद्ध करण्याचं नाव जरी घेतलं, तरी मी भानावर राहत नाही. मन आणि बुद्धी ठिकाणावर राहत नाही.

देखें देह कांपत । तोंड असे कोरडें होत ।
विकळता उपजत । गात्रांसी ।। १९६ ।।

सर्वांगा कांटाळा आला । अति संताप उपजला ।
तेथें बेंबळ हात गेला । गांडीवाचा ।। १९७ ।।

पाहा, माझ्या शरीरात कंप आहे. तोंडाला कोरड पडली. सर्व अवयवांत शिथिलता निर्माण झाली. सर्वांगावर काटा उभा राहिला. शरीर अतिशय तापलं. गांडीव धनुष्य धरणारा हात लुळा झाला.

तें न धरतचि निष्टलें । परि नेणेंचि हातोनि पडिलें ।
ऐसें हृदय असे व्यापिलें । मोहें येणें ।। १९८ ।।

धनुष्य न धरता निसटलं, की आपोआप हातातून पडलं, हे मला कळलंच नाही. अशाप्रकारे या मोहानं माझं हृदय व्याप्त केलं.

जें वज्रापासोनि कठिण । दुर्धर अतिदारुण ।
तयाहून असाधारण । हें स्नेह नवल ।। १९९ ।।

अर्जुनाचं हृदय युद्धाच्या वेळी वज्रापेक्षा कठीण होतं. कशानंही वश न होणारं असं दुर्धर, महाभयंकर अर्जुनाचं हृदय आहे. त्याहूनही स्नेहाची विशेषता असाधारण आहे.

जेणें संग्रामीं हर जिंतिला । निवातकवचांचा ठाव फेडिला ।
तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजी ।। २०० ।।

ज्याने युद्धात कौशल्य दाखवून शंकराचं मन जिकलं. निवात आणि कवच यांचा या जगातून ठावठिकाणाच नाहीसा केला, असा अर्जुन एका क्षणात मोहानं ग्रासला.

चिंतन – भगवान शंकर आणि मायावी राक्षस हे दोन अमानवी आहेत. यांना हरविणारा अर्जुन मानवाच्या मोहात अडकला. ही स्नेहाची विशेषता आहे.

जैसें भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें ।
परि कळिकेमाजि सांपडे । कोंवळिये ।। २०१ ।।

तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणे ।
तैसें कठिण कोंवळेपणें । स्नेह देखा ।। २०२ ।।

ज्याप्रमाणे भुंगा हा वाटेल त्याप्रकारचे कोरडं लाकूड कोरतो; परंतु तोच कोवळ्या कमळाच्या कळीमध्ये अडकतो. तिथं तो प्राणाला मुकेल; परंतु कमळपाकळ्या चिरण्याचा विचार त्याच्या मनात येणार नाही. हळवेपणामुळे कोवळेपणातही काठिण्य जाणवते.

हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही न येचि आया ।
म्हणऊनि भुलविला ऐकें राया । संजयो म्हणे ।। २०३ ।।

संजय म्हणतो, हे राजा, ऐक. हा स्नेह म्हणजे आदिपुरुषाची माया आहे. ब्रह्मदेवालाही आकळली जात नाही. या स्नेहरूपी मायेनं अर्जुनाला भुलविलं.

अवधारीं मग तो अर्जुन । देखोनि सकळ स्वजन ।
विसरला अभिमान । संग्रामींचा ।। २०४ ।।

राजा ऐक, तो अर्जुन सर्व स्वजनांना पाहून युद्धाचा स्वाभिमान विसरून गेला.

कैसी नेणों सदयता । उपनली तेथ चित्ता ।
मग म्हणे कृष्णा आतां । नसिजे एथ ।। २०५ ।।

अर्जुनाच्या अंत:करणात दया उत्पन्न झाली. ती कशी झाली हे कळत नाही. मग अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला, इथे आपण आता नमलं पाहिजे.

माझें अतिशयें मन व्याकुळ । होतसे वाचा बरळ ।
जे वधावे हे सकळ । येणें नांवें ।। २०६ ।।

या सर्वांना मारायचं आहे. यांचा वध करायचा आहे, हे मनात येताच माझं मन अतिशय व्याकुळ होतं. माझी वाणी बोबडी होते.

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ।। ३१ ।।

या युद्धाच्या निमितानं काहीतरी विपरीत घडणार आहे, असं मला वाटतं. नाही तरी स्वजनांना मारून कोणतं कल्याण होणार आहे? याच्यातून काही चांगलं प्राप्त होईल, असं मला वाटत नाही.

या कौरवां जरी वधावें । तरी युधिष्ठिरादिकां कां न वधावें ।
हे येरयेर आघवे । गोत्रज आमुचे ।। २०७ ।।

या कौरवांना मारणं जर योग्य आहे, तर युधिष्ठिरादिकांना का मारू नये? आम्ही परस्पर बंधूच आहोत, एका गोत्रातील आहोत.

म्हणोनि जळो हें जुंझ । प्रत्यया न ये मज ।
एणें काय काज । महापापें ।। २०८ ।।

म्हणून आग लागो या युद्धाला! हे युद्ध मला पसंत नाही. हे महापाप करण्याची काय गरज आहे?

देवा बहुतांपरी पाहातां । एथ वोखटें होईल जुंझतां ।
वरी कांहीं चुकवितां । लाभ आथी ।। २०९ ।।

देवा, अनेक दृष्टीनं विचार केला असता, यावेळी हे युद्ध करणं वाईट आहे. जर चुकवता आलं, तर लाभ होईल.

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ।। ३२ ।।

येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ।। ३३ ।।

कृष्णा! मला विजयाची इच्छा नाही, न राज्याचं सुख हवंय. हे गोविंदा, असल्या राज्याचा काय उपयोग, हे भोग काय कामाचे, असल्या जगण्याला तरी काय अर्थ आहे. ज्याच्याकरिता राज्य हवंय, सुख आणि भोग हवेत, तेच या युद्धात धन आणि प्राणाचा त्याग करून उभे आहेत.

तया विजयवृत्ती कांहीं । मज सर्वथा काज नाहीं ।
एथ राज्य तरी कायी । पावोनियां ।। २१० ।।

या सकळांतें वधावें । मग जे भोग भोगावे ।
ते जळोत आघवे । पार्थ म्हणे ।। २११ ।।

अर्जुन म्हणाला, मला विजयाच्या आकांक्षेशी काही कर्तव्य नाही. असलं राज्य मिळवून तरी काय करायचं? या सर्वांना मारून मग जे भोग भोगायचे आहेत, त्या सर्वांना आग लागो.

तेणें सुखेंवीण होईल । तें भलतैसें साहिजेल
वरी जीवितही वेंचिजेल । यांचिलागीं ।। २१२ ।।

परी यासी घात कीजे । मग आपण राज्यसुख भोगिजे ।
हें स्वप्नींही मन माझें । करूं न शके ।। २१३ ।।

राज्य नसल्यामुळे भोगाशिवाय जगणं असेल, कोणतीही परिस्थिती आली तरी सहन करू. इतकंच काय, यांच्यासाठी प्राण खर्ची पडले तरी चालेल; परंतु यांना मारायचं, मग आपण राज्य सुख भोगायचं, असं स्वप्नातही माझं मन करू शकणार नाही.

तरी आम्हीं कां जन्मावें । कवणालागीं जियावें ।
जरी वडिलां यां चिंतावें । अहित मनें ।। २१४ ।।

जर वडीलधाऱ्यांविषयी अहित चिंतायचं असेल, तर मग जन्माला येऊन काय उपयोग? चिंतनीय विषय आहे. वाईट वागणं हा खूप दूरचा विषय आहे. थोरामोठ्यांविषयी अहिताचं चिंतनदेखील नकोय. सत्ता, भोगदेखील कोणाच्या मानसिक त्रासातून आलेले नकोत. तळतळाटीचे तर नकोच नको. याला भारतीय संस्कृती म्हणतात.

पुत्रातें इच्छी कुळ । तयाचें कायि हेंचि फळ
जे निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें ।। २१५ ।।

कुळातील माणसं पुत्राची इच्छा करतात. पुत्रांनी आप्तेष्टांचा संहार करावा. यासाठीच का पुत्र हवा? किंबहुना हेच फळ आहे का?

हें मनींचि केविं धरिजे । आपण वज्राचेंया होइजे ।
वरी घडे तरी कीजे । भलें इयां ।। २१६ ।।

गोत्रजांचा वध करणं हे मनात तरी कसं आणावं? वज्रासारखं कठोर तरी कसं व्हावं? झालंच तर यांचं कल्याणच करावं; परंतु यांचा वध करू नये.

आम्हीं जें जें जोडावें । तें समस्तीं इहीं भोगावें ।
हें जीवितही उपकारावें । काजीं इयांच्या ।। २१७ ।।

आम्ही दिगंतींचे भूपाळ । विभांडूनि सकळ ।
मग संतोषविजे कुळ । आपुलें जें ।। २१८ ।।

आम्ही जे जे मिळवावं ते सर्वांनी मिळून भोगावं. यांच्या कामाकरिता प्राण खर्ची घालून यांच्याच उपयोगाला यावं. देशोदेशीच्या राजांना जिंकून जे मिळवलं ते यांच्या सेवेत असावं. जेणेकरून आपलं कुळ समाधानी राहील. हेच आमचं मुख्य काम आहे. याकरिताचं कुळ पुत्राची इच्छा करीत असतं.

तेचि हे समस्त । परी कैसें कर्म विपरीत ।
जे जहाले असती उद्यत । जुंझावया ।। २१९ ।।

परंतु आज दुर्दैव पाहा, कर्म विपरीत झाल्यामुळे सर्व गुरुगोत्रज युद्धासाठी सज्ज झाले आहेत.

अंतोरिया कुमरें । सांडोनियां भांडारें ।
शस्त्राग्री जिव्हारें । आरोपुनी ।। २२० ।।

ऐसियांतें कैसेनि मारूं । कवणावरी शस्त्र धरूं
निजहृदया करूं । घात केवीं ।। २२१ ।।

बायका, मुलं, खजिना सर्व सोडून, तलवारीच्या धारेवर प्राण ठेवून जे युद्धास तयार झाले आहेत, अशांना मी मारू तरी कसा? मी कोणावर शस्त्र धरू? स्वत:च्या हृदयाचा घात कसा करू? अर्थात गोत्रज हे आपलेच आहेत, असं मानल्यामुळे त्यांना मारणं म्हणजे स्वत:च्या हृदयाचा घात करणं होय.

आचार्या: पितर: पुत्रास्तथैव च पितामहा: ।
मातुला: श्वशुरा: पौत्रा: श्याला: संबन्धिनस्तथा ।। ३४ ।।

हे नेणसी तूं कवण । परि पैल भीष्मद्रोण ।
जयांचे उपकार असाधारण । आम्हां बहुत ।। २२२ ।।

ज्यांचे उपकार असामान्य आहेत असे भीष्म आणि द्रोण पलीकडे उभे आहेत. यांनी फार उपकृत केलं आहे. यांना तू ओळखत नाहीस का?

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ।। ३५ ।।

माझे गुरू, पितृतुल्य स्वजन, पुत्र, आजोबा असलेले भीष्म, मामा, सासरे, नातू, मेव्हणे, इतर नातेवाईक जे मला मारू इच्छितात, त्यांना मी मारू इच्छित नाही. पृथ्वीचं राज्य तर सोडून द्या, त्रैलोक्याचं राज्य मिळालं तरी मी यांना मारण्याची इच्छा करणार नाही.

एथ शालक सासरे मातुल । आणि बंधु कीं हे सकळ
पुत्र नातू केवळ । इष्टही असती ।। २२३ ।।

इथे मेव्हणे, सासरे, मामा आणि सर्व बंधू, पुत्र, नातू एवढेच नाही तर केवळ इष्ट म्हणजे आवडणारेही आहेत.

अवधारीं अति जवळिकेचे । हे सकळही सोयरे आमुचे ।
म्हणोनि दोष आथि वाचे । बोलतांचि ।। २२४ ।।

देवा, इकडे लक्ष दे, अतिशय जवळचे नातेवाईक आहेत. यांना मारणं तर सोडून दे, केवळ वाणीनं बोललं तरी पाप लागतं.

हे वरी भलतें करितु । आतांचि एथें मारितु ।
परी आपण मनें घातु । न चिंतावा ।। २२५ ।।

याउलट, हे काहीही करोत. आताच मारणार असतील मारोत; परंतु आपण मनानंदेखील घात चिंतू नये.

त्रैलोक्यींचें अनकळित । जरी राज्य होईल प्राप्त ।
तरी हें अनुचित । नाचरें मी ।। २२६ ।।

समग्र त्रैलोक्याचं निष्कंटक राज्य आज जरी मिळालं, तरी मी अयोग्य कर्म करणार नाही. चुकीचं आचरणात आणणार नाही.

जरी आजि एथ ऐसें कीजे । तरी कवणाच्या मनीं उरिजे ।
सांगें मुख केवीं पाहिजे । तुझें कृष्णा ।। २२७ ।।

आज जर आम्ही इथे चुकीचं कर्म केलं; तर आमच्याविषयी कोणाच्या मनात आदर राहील? याशिवाय पाप झाल्यावर तुझं तोंड कसं पाहणार?

चिंतन – आपलं अस्तित्व माणसाच्या मनात आदरानं राहिलं पाहिजे. महापुरुष पिढ्यान् पिढ्या जनतेच्या मनावर अधिराज्य करतात. जर काही पाप केलं, तर ताठ मानेनं जगता येत नाही. किती धनवान आणि ज्ञानवान आहे, याला काहीच किंमत नसते. जनतेच्या मनात उरणं यालाच 'अमरपण' म्हणतात. सर्वांचं शरीर तर नश्वर आहे. 'मनी उरिजे' हे महत्त्वाचं आहे.

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ।। ३६ ।।

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान् स्वबान्धवान्
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ।। ३७ ।।

हे जनार्दन, धृतराष्ट्राच्या पुत्रांना मारून आमचं काय प्रिय होणार? या आततायींना मारून आम्हाला पापच लागेल, म्हणून जे आमचे बांधव आहेत त्यांना मारणं योग्य नाही. हे माधव, स्वजनांना मारून आम्ही कसे सुखी होणार?

जरी वध करीं गोत्रजांचा । तरी वसौटा होऊनि दोषांचा ।
मज जोडिलासि तूं हातींचा । दूर होसी ।। २२८ ।।

मी जर गोत्रजांचा वध केला, तर सर्व दोषांचं वसतिस्थान होईल. पुण्यानं जोडलेला तू माझ्यापासून दूर होशील. पाप्यांना मारून पाप होईल. माझं पुण्य संपेल. मग तू माझ्याजवळ राहणार नाहीस.

चिंतन – उत्तम संगतीला बाधक दोष असतात. देव, गुरू आणि संत यांच्या संगतीत ब्रह्मसुख आहे हे सत्य आहे. आपण त्यांच्या संगतीसाठी योग्य आहोत का? हा विचार प्रथम करावा लागेल. एका चुकीमुळे प्रेम करणारी मोठी माणसं दूर होतात. सामान्याची संगत म्हणजे यातनामय जीवन होय. जीवन आहे; परंतु जगणं नाही.

कुळहरणी पातकें । तियें आंगीं जडती अशेखें ।
तये वेळीं तूं कवणें कें । देखावासी ।। २२९ ।।

गोत्रजांसह आदरणीयांचा घात केल्यामुळे होणारी पातकं जेव्हा अंगी येतील, तेव्हा तुला कोणी, कुठं पाहावं? पापी माणसांना कोणी जवळ करीत नाही. मग पाप्यानं चांगल्या महापुरुषांना कुठं शोधावं? कोण शोधून देईल? याशिवाय जवळ कोण काणार? पुढील दृष्टांत महत्त्वाचे आहेत.

जैसा उद्यानामाजी अनळ । संचरला देखोनि प्रबळ ।
मग क्षणभरी कोकिळ । स्थिर नोहे ।। २३० ।।

कां सकर्दम सरोवर । अवलोकुनि चकोर ।
न सेवित अव्हेर । करूनि निघे ।। २३१ ।।

उदाहरणार्थ, जर उद्यानात भयंकर अग्नीनं पेट घेतला, तर कोकिळ क्षणभरदेखील थांबणार नाही किंवा चिखलानं भरलेलं सरोवर पाहून चकोर अव्हेर करून निघून जातो. तो त्या पाण्याचं सेवन करीत नाही.

चिंतन – उद्यान हे जीवनाचं प्रतीक आहे. अग्नीप्रमाणे असणारे दोष, एका क्षणात अतिशय शिस्तबद्ध आणि आखीवरेखीव जीवनही उद्ध्वस्त करतात. 'सकर्दम सरोवर' म्हणजे चिखलानं भरलेलं सरोवर. अशा पाण्याकडे हिंस्र प्राणी, डुकरं येतात. चंद्रकिरण प्राशन करणारा चकोर मात्र त्याकडे ढुंकून पाहत नाही. पापयुक्त धनासाठी 'सकर्दम सरोवर' हे शब्द माउलींनी वापरले आहेत. ज्यांच्याकडे शीतल ज्ञानिकरणं आहेत, असे लोक पाप्यांना जवळ करीत नाहीत. 'त्रिविध ताप आणि गलिच्छ संगती' या दोन दृष्टांतात दोन सिद्धांत आहेत.

तयापरी तूं देवा । मज झकवून न येसी मावा ।
जरी पुण्याचा वोलावा । नाशिजैल ।। २३२ ।।

त्याप्रमाणे देवा, तू मला मायेनं फसवून जाशील, माझा तिरस्कार करशील. जर माझ्यातील पुण्याचा ओलावा संपला तर.

म्हणोनि मी हें न करीं । इये संग्रामीं शस्त्र न धरीं ।
हें किडाळ बहुतीं परी । दिसतसे ।। २३३ ।।

म्हणून मी हे करणार नाही. या युद्धात मी शस्त्र धरणार नाही. विचारांती हे युद्ध पुष्कळ दोषांनी भरलेलं आहे. वाईटच आहे हे मला स्पष्ट दिसत आहे.

तुजसीं अंतराय होईल । मग सांगें आमुचें काय उरेल ।
तेणें दु:खें हिये फुटेल । तुजवीण कृष्णा ।। २३४ ।।

तुझ्या-माझ्यात अंतर पडणार. ही हानी सर्वांत मोठी असेल. ती हानी कोण भरून काढणार? कृष्णा, तुझ्या वियोगानं आमचं हृदय फुटेल.

म्हणौनि कौरव हे वधिजती । मग आम्ही भोग भोगिजती ।
हे असो मात अघडती । अर्जुन म्हणे ।। २३५ ।।

अर्जुन म्हणाला, राज्यसुख, सत्ता, भोग यासाठी कौरवांना मारावं, मग आम्ही हे भोग भोगावेत. हे सर्व राहू दे. अघडती म्हणजे न घडणारी घटना आहे म्हणून सोडून दे.

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ।। ३८ ।।

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ।। ३९ ।।

राज्यलोभानं ज्यांचं चित्त मारलं गेलं आहे, असे कौरव कुलक्षयापासून होणारे दोष आणि मित्रद्रोहाचं पातक पाहत नसले, तरी आम्ही का डोळेझाक करावी? आम्ही या पापापासून का बरं निवृत्त होऊ नये? अर्थात, आम्हाला हे समजलं पाहिजे.

हे अभिमानमदें भुलले । जऱ्हीं पां संग्रामा आले ।
तऱ्हीं आम्हां हित आपुलें । जाणावें लागे ।। २३६ ।।

जरी हे कौरव, सत्तेच्या मदानं उन्मत्त होऊन युद्धाला आले असले, तरी आम्हाला आपलं हित पाहावं लागेल.

हें ऐसें कैसें करावें । जे आपुले आपण मारावे ।
जाणतजाणतांचि सेवावें । काळकूट ।। २३७ ।।

काहीच्या काही करण्यात काय अर्थ आहे. आपण आपल्यांनाच मारायचं काय? समजून उमजून भयंकर हलाहल विष प्यायचं का?

हां जी मार्ग चालतां । पुढां सिंह जाहला अवचिता ।
तो तंव चुकवितां । लाभ आथि ।। २३८ ।।

असता प्रकाश सांडावा । मग अंधकूप आश्रावा ।
तरी तेथ कवण देवा । लाभ सांगें ।। २३९ ।।

जी, मार्गक्रमण करीत असताना अचानक सिंह समोर आला, तर त्याला चुकविण्यात लाभ आहे. असलेल्या प्रकाशाचा त्याग करायचा आणि अंधाऱ्या विहिरीत जाऊन राहायचं, असं करण्यात कोणता लाभ आहे?

कां समोर अग्नि देखोनी । जरी न वचिजे वोसंडोनी ।
तरी क्षणी एका कवळुनी । जाळूं सके ।। २४० ।।

तैसे दोष हे मूर्त । अंगीं वाजो असती पाहात ।
हें जाणतांही केविं एथ । प्रवर्तावें ।। २४१ ।।

अथवा, समोर आग लागलेली आहे, तेथून जर दूर गेलो नाही, तर तो एका क्षणात सर्व बाजूनं

वेढून जाळून टाकील. त्याप्रमाणे कुलक्षयापासून, पापापासून होणारे हे दोष आहेत. आपल्या अंगावर आदळू पाहत आहेत. हे सर्व समजत असतानाही इथं आपण कसं प्रवृत व्हावं?

ऐसें पार्थ तिये अवसरीं । म्हणे देवा अवधारीं ।
या कल्मषाची थोरी । सांगेन तुज ।। २४२ ।।

एवढं बोलून अर्जुन पुढे म्हणाला, देवा, इकडे लक्ष दे, आणखी या पापाचं महत्त्व तुला सांगतो.

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ।। ४० ।।

कुलक्षय झाला असता सनातन कुळधर्म नष्ट होतात. राहिलेल्यांना अधर्म व्यापतो. अर्थात, उर्वरित असलेली अधर्मपरायण होतात.

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे । तेथ वन्हि एक उपजे ।
तेणें काष्ठजात जाळिजे । प्रज्वळलेनी ।। २४३ ।।

तैसा गोत्रींचि परस्परे । जरी वध घडे मत्सरें ।
तरी तेणें महादोषें घोरें । कुळचि नाशे ।। २४४ ।।

म्हणवूनि एणें पापें । वंशजधर्म लोपे ।
मग अर्धमचि आरोपे । कुळामाजी ।। २४५ ।।

लाकडानं लाकडाला घासलं असता तिथं एक अग्नी उत्पन्न होतो. तो भडकला की सर्व लाकडांना जाळून टाकतो. त्याप्रमाणे गोत्रजानं गोत्रजांचा जर वध केला, तर त्या महादोषानं संपूर्ण कुळ नाश पावतं. म्हणून या पापानं वंशपरंपरागत धर्म लोप पावतो. मग उर्वरित कुळामध्ये अधर्माचा प्रसार होतो.

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसङ्करः ।। ४१ ।।

सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ।। ४२ ।।

हे वृष्णिकुलोत्पन्न कृष्णा, अधर्मामुळे कुलीन स्त्रिया बिघडतील. स्त्रिया बिघडल्यामुळे वर्णसंकर होईल. संकर झाल्यानं कुळांना आणि कुळघातकी असणाऱ्यांना नरकवासच असतो. या शिवाय पूर्वज नरकात जातात.

एथ सारासार विचारावें । कवणें काय आचरावें ।
आणि विधिनिषेध आघवे । पारुषती ।। २४६ ।।

सारासार म्हणजे सत्य, असत्य यांचा विचार, कोणी काय आचरण करावं. कर्तव्य, अकर्तव्य

या सर्व बाबीही नष्ट होतील.

असता दीप दवडिजे । मग अंधकारीं राहाटिजे ।
तरी उजूचि कां अडखुळिजे । जयापरी ।। २४७ ।।

तैसा कुळीं कुळक्षय होय । तये वेळीं तो आद्यधर्म जाय ।
मग आन कांहीं आहे । पापावांचुनी ।। २४८ ।।

असलेला दिवा विझवायचा आणि अंधारात फिरायचं. सपाट जागेवर चालतानादेखील ज्याप्रमाणे मनुष्य अडखळतो, त्याप्रमाणे कुलक्षय झाल्यामुळे कुळातील सामान्य धर्माचरणातदेखील माणसे अडखळतील; कारण आद्य धर्म आणि वंशपरागत आचरण नष्ट होणार. परंपरेची आणि आद्य धर्माची माहिती मागची पिढी देत असते. तीच आपण आपसांत युद्ध करून नष्ट करत आहोत. पुढे अधर्माशिवाय काय शिल्लक राहणार?

जैं यमनियम ठाकती । तेथ इंद्रियें सैरा राहटती ।
म्हणौनि व्यभिचार घडती । कुळस्त्रियां ।। २४९ ।।

उत्तम अधमीं संचरती । ऐसे वर्णावर्ण मिसळती ।
तेथ समूळ उपडती । जातिधर्म ।। २५० ।।

यमनियम म्हणजे ज्ञानेंद्रियांसह कर्मेंद्रियांचं नियंत्रण. हे नियंत्रण संपलं, तर इंद्रियं स्वैराचारी होतील. स्वैराचारामुळे कुलीन स्त्रियांकडून चुकीचं आचरण घडेल. योग्य-अयोग्याच्या मिश्रणातून जन्माला आलेल्या संततीमुळे कुळधर्म समूळ नष्ट होतील.

जैसी चोहटाचिये बळी । पाविजे सैरा काउळीं ।
तैसीं महापापें कुळीं । संचरती ।। २५१ ।।

ज्याप्रमाणे चव्हाट्यावर ठेवलेल्या बळीवर चारही बाजूनं कावळे येऊन आक्रमण करतात, त्याप्रमाणे महापाप कुळात प्रवेश करतात.

मग कुळा तया अशेखा । आणि कुलघातकां ।
येरयेरां नरका । जाणें आथि ।। २५२ ।।

मग त्या संपूर्ण कुळाला आणि जे कुळघातकी असतील त्या दोघांना नरकाला जावं लागेल. पतन हाच नरक आहे. मानसिक अशांती, वेदना यांनाच नरकयातना म्हणतात.

देखें वंशवृद्धि समस्त । यापरी होय पतित ।
मग वोवांडिती स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ।। २५३ ।।

जेथ नित्यादि क्रिया ठाके । आणि नैमित्तिक क्रिया पारुखे ।
तेथ कवणा तिळोदकें । कवण अर्पी ।। २५४ ।।

देवा, बघ याप्रमाणे वंशात वाढलेली सर्व प्रजा पतित होते. स्वर्गस्थ असणाऱ्या पूर्वपुरुषांना स्वर्गातून ढकलून देतात, जिथे वंशपरंपरागत नित्य क्रिया आणि इतर नैमित्तिक क्रिया बंद पडतात. अशा परिस्थितीत कोण कोणाला तिलोदक अर्पण करणार? अंत्यविधीसहित पितरांची क्रिया कोण करणार?

तरी पितर काय करिती । कैसेनि स्वर्गी वसती ।
म्हणोनि तेही येती । कुळापासीं ।। २५५ ।।

जैसा नखाग्री व्याळ लागे । तो शिखांत व्यापी वेगें ।
तेवी आब्रह्म कुळ अवघें । आप्लविजे ।। २५६ ।।

अशा स्थितीत पितर तरी काय करणार? स्वर्गात कसे राहणार? म्हणून तेदेखील आपल्या कुळापासी येतात. ज्याप्रमाणे नखाच्या टोकाला विषारी नाग चावला, तर त्याचं विष शेंडीपर्यंत येतं. त्याचप्रमाणे ब्रह्मदेवापासूनचे पुढील सर्व कुळ पातकात बुडून जातं.

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसङ्करकारकैः ।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ।। ४३ ।।

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरकेऽनियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ।। ४४ ।।

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ।। ४५ ।।

कुलक्षय करणाऱ्याच्या पुढच्या पिढीत वर्णसंकर होऊन वर्णधर्म, कुळधर्म नाहीसे होतात. हे जनार्दना, ज्याचे कुळधर्म नष्ट झाले, त्याचे निश्चित नरकात वास्तव्य होते. अहो, राज्यसुखाच्या लोभानं आम्ही स्वजनांना मारण्यास तयार झालो आहोत. केवढं हे महापाप आहे, जे आमच्याकडून होत होतं.

देवा अवधारीं आणीक एक । एथ घडे महापातक ।
जे संगदोषें हा लौकिक । भ्रंश पडे ।। २५७ ।।

जैसा घरीं आपुला । वानिवसें अग्नि लागला ।
तो आणिकांहीं प्रज्वळिला । जाळूनि घाली ।। २५८ ।।

देवा, ऐक. इथे आणखी एक महापातक घडतं. कुळात वर्णसंकर दोष निर्माण झाल्यामुळे त्याच्या संगतीत इतरांचे आचारविचार भ्रष्ट होतात. दुर्दैवानं आपल्या घराला अग्नी लागला आणि भडकला तर शेजारील घरांना जाळतो.

तैसिया तया कुळसंगती । जे जे लोक वर्तती ।
तेही बाधा पावती । निमित्तें येणें ।। २५९ ।।

त्याप्रमाणे त्या कुळसंगतीत जी जी माणसं राहतात त्यांनाही बाधा होते. संगतीच्या निमित्तानं संसर्गदोष बाधल्याशिवाय राहत नाही.

तैसें नाना दोषें सकळ । अर्जुन म्हणे तें कुळ ।
मग महाघोर केवळ । निरय भोगी ।। २६० ।।

पडिलिया तिये ठायीं । मग कल्पांतींही उकल नाही ।
येसणें पतन कुळक्षयीं । अर्जुन म्हणे ।। २६१ ।।

अर्जुन म्हणतो, अनेक प्रकारच्या दोषांमुळे त्या संगतीत येणाऱ्या सर्व कुळांना महाभयंकर नरकभोग प्राप्त होतात. एकदा का पतन झालं, मग कल्पाच्या अंतीही सुटका होत नाही. कुळक्षयामुळे एवढी अधोगती होते.

देवा हें विविध कानीं ऐकिजे । परी अझुनिवरी त्रास नुपजे ।
हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारीं पां ।। २६२ ।।

देवा, या दोषांसंबंधी हे अनेक प्रकारचं ऐकलंस, तरीदेखील तुला अजून त्रास होत नाही. तू आपलं हृदय वज्राचं केलं की काय?

दुसरा अर्थ – देवा, या दोषांसंबंधी आम्ही सर्व ऐकतच आलो आहोत; परंतु याचा अजून कोणालाही त्रास होत नाही. सत्ता, संपत्तीभोग यांच्यासाठी हृदय वज्राचं झालं, याला काय करावं?

अपेक्षिजे राज्यसुख । जयालागीं तें तंव क्षणिक ।
ऐसें जाणतांही दोख । अव्हेरूं ना ।। २६३ ।।

जयालागी म्हणजे शरीरासाठी, राज्यसुखाची अपेक्षा करावी, तर ते शरीर क्षणभंगुर आहे. हे कळत असतानाही दोषांचा त्याग करू नये का?

जे हे वडिल सकळ आपुले । वधावया दिठी सूदले ।
सांग पां काय थेंकुलें । घडलें आम्हां ।। २६४ ।।

इथे एकत्रित झालेले जे हे वडीलधारे आहेत, त्यांचा वध करावा या दृष्टीनं त्यांच्याकडे पाहिलं, हे काय कमी पाप झालं?

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ।। ४६ ।।

ज्यांच्या हातात शस्त्र आहे असे दुर्योधनादि कौरव, प्रतिकार न करणाऱ्या शस्त्रहीन असलेल्या मला मारलं; तरी माझं कल्याणच होईल.

आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें बरवें ।
जे शस्त्रें सांडूनि साहावे । बाण यांचे ।। २६५ ।।

आता इतकं झाल्यावर जगण्यापेक्षा शस्त्र सोडून, यांचे बाण सहन करावे, हेच चांगलं.

तयावरी होय जितुकें । तें मरणही वरी निके ।
परी येणें कल्मषें । चाड नाहीं ।। २६६ ।।

त्यानंतर जेवढं होईल तेवढं दुःख सहन करावं. पाप करण्यापेक्षा हे चांगलंच आहे. यात मरण आलं तर अधिक उत्तम म्हणायचं; परंतु आता पाप करण्याची माझी इच्छा नाही.

ऐसें देखून सकळ । अर्जुनें आपुलें कुळ ।
मग म्हणे राज्य तें केवळ । निरयभोग ।। २६७ ।।

याप्रमाणे जमलेल्या गोत्रजांना पाहून अर्जुन म्हणाला, राज्य म्हणजे केवळ नरकभोग आहे.

चिंतन – राज्यसुख म्हणजे आत्ताच्या भाषेत सत्ता. काहीही करून सत्ता मिळवावी, हेच ध्येय राजकारणी लोकांमध्ये असतं. हा इतिहास जुना आहे; परंतु आजही तो पाहता येतो. राजकारण हे सज्जन माणसाचं काम नाही, असं जे म्हणतात ते सत्य आहे. राजकरणात 'धृतराष्ट्र' राजा असतो आणि राजाला काही दिसत नसतं.

संजय उवाच – **एवमुक्त्वार्जुनः सङ्ख्ये रथोपस्थ उपाविशत् ।**
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ।। ४७ ।।

संजय म्हणाला– अशाप्रकारे बोलून दुःखानं (शोकानं) ज्याचं मन व्याकुळ झालं आहे असा अर्जुन रथातून उडी मारून रथाच्या खाली बसला.

ऐसें तिये अवसरीं । अर्जुन बोलिला समरीं ।
संजय म्हणे अवधारीं । धृतराष्ट्रातें ।। २६८ ।।

मग अत्यंत उद्वेगला । न धरत गहिंवर आला ।
तेथ उडी घातली खालां । रथौनियां ।। २६९ ।।

संजय धृतराष्ट्राला म्हणाला, ऐक, उपरोक्त वाक्यं अर्जुन रणांगणावर बोलला. मग अत्यंत उदास झाला, न आवरणारा हुंदका आला. अर्जुनानं रथावरून खाली उडी मारली.

जैसा राजकुमर पदच्युत । सर्वथा होय उपहत ।
कां रवि राहुग्रस्त । कळाहीन ।। २७० ।।

सत्तेतून खाली खेचलेला राजकुमार जसा निस्तेज दिसतो, किंवा राहूनं ग्रासलेला चंद्र जसा तेजरहित दिसतो, त्याप्रमाणे तो धनुर्धर दिसत होता.

ना तरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतिला तापस भ्रमे ।
मग आकळूनि कामें । दीन कीजे ।। २७१ ।।

अथवा, महासिद्धीच्या आवेशानं जिंकलेला तपस्वी भ्रमात पडतो, मग काम त्याला दीन बनवतो.

चिंतन – आत्मसाधनेत रमलेल्या तपस्वीला महासिद्धी बाधक असते; परंतु तिचा आवेश साधकात होत असतो. सिद्धी म्हणजे इच्छापूर्ती. महासिद्धी म्हणजे मोठी इच्छा सिद्धीला जाणं. सतत इच्छापूर्ती होत असल्यानं तपस्वी; किंबहुना साधक मोहात अडकतो. हीच इच्छा तरुण होते तेव्हा 'काम' या नावानं ओळखली जाते. 'तेथ इच्छा हे कुमारी जाली । मग ते कामाचिया तारुण्या आली ।' (ज्ञा. ७-१६६) हा काम त्या त्या तपस्या करणाऱ्या साधकाला अधीन करून मग दीन करतो. दीन ही अवस्था फार वाईट असते. सामान्य तर सामान्यच असतात; परंतु विशेष असणारे जेव्हा दीन होतात तेव्हा त्यांना पाहावंसं वाटत नाही.

तैसा तो धनुर्धर । अत्यंत दुःखें जर्जर ।
दिसे जेथ रहंवर । त्यजिला तेणें ।। २७२ ।।

मग धनुष्यबाण सांडिले । न धरत अश्रुपात आले ।
ऐसें ऐक राया वर्तलें । संजयो म्हणे ।। २७३ ।।

त्याप्रमाणे तो धनुर्धर, दुःखानं अत्यंत जर्जर झालेला दिसत होता. जेव्हा त्यानं रथाचा त्याग केला होता. मग त्यानं धनुष्यबाण टाकलं. न आवरता येणारे अश्रू आले. संजय म्हणाला, राजा, ऐक असा प्रकार तिथे घडला.

आतां यावरी तो वैकुंठनाथ । देखोनि सखेद पार्थ ।
कवणे परी परमार्थ । निरूपील ।। २७४ ।।

ते सविस्तर पुढारी कथा । अति सकौतुक ऐकतां ।
ज्ञानदेव म्हणे आतां । निवृत्तिदास ।। २७५ ।।

आता यानंतर वैकुंठनाथ भगवान श्रीकृष्ण, खिन्न झालेल्या अर्जुनाला पाहून कोणत्या प्रकारचं तत्त्वज्ञान सांगणार आहे, ती सविस्तर पुढची कथा आपण ऐकणार आहात. अति उत्सुकतेनं ऐकावं, असं श्री निवृत्तिदास व ज्ञानदेव म्हणतात.

इति श्रीज्ञानदेवकृत भावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ।। १ ।।

श्लोक ४७, ओव्या २७५